प्रकरण ७

# लोकशाही

जानकी श्रीनिवासन

**रूपरेषा :**

विषय प्रवेश
संकल्पना
प्रत्यक्ष सहभागात्मक लोकशाही
उदारमतवादी लोकशाही
लोकशाहीवरील आक्षेप
लोकशाहीचे दृष्टीकोन
लोकशाहीवरील काही वाद

Scanned with CamScanner

# विषय प्रवेश

राजकीय सिद्धांतात तसेच राजकारणाकरील सामान्य चर्चांमध्ये लोकशाही हा सर्वाधिक जास्त चर्चला जाणारा विषय आहे. या प्रकरणात लोकशाहीवरील आक्षेप व समर्थनाचा उहापोह केलेला आहे. तसेच लोकशाहीच्या काही दृष्टीकोनांचा विचार करण्यात आला आहे.

समजा, मित्रांच्या एका कंपूला चित्रपट बघण्यास जावे की नाही हे ठरवायचे आहे, किंवा दहा मित्रांच्या गटात सातजणांना चित्रपट बघण्याची इच्छा आहे तर तिघांना कला प्रदर्शन बघावेसे वाटते. मग सर्वांनी मिळून काय ठरवावे? जेथे सामूहिकतेचा प्रश्न असतो, तेथे सर्वांनी मिळून निर्णय करणे आवश्यक असते. हे निर्णय कोण व कसे करतात? हे निर्णय योग्य आहेत हे आपण कोणत्या आधारावर मानावे? लोकशाहीची संकल्पना असे निर्णय करण्यास आधार निर्माण करते. लोकशाहीमध्ये निर्णय घेण्यासाठी लोकांच्या इच्छा विचारात घेतल्या जातात. वस्तुत: हे निर्णय एक व्यक्तिदेखील करू शकते. पण लोकशाहीमध्ये सर्वांच्या पर्यायांचा समान विचार करणे आवश्यक मानले जाते. म्हणजे लोकशाही मूल्यांना मानते.

## संकल्पना

एखाद्या राजकीय समुदायात सत्ता कोणाची असेल हे कसे ठरवावे? शासन स्थापनेची मार्गदर्शक तत्वे कोणती असावीत? या सर्व प्रश्नांचे लोकशाही व्यवस्था हे एकच उत्तर आहे, आणि ते सर्वमान्य आहे. हुकूमशहा, सैनिकी-शासक किंवा राजादेखील स्वत:ला लोकशाही विचारांचा म्हणून मिरवतो. लोकशाहीचा 'लोकांचे शासन' असा अर्थ होतो. लोकशाहीचे स्वरूप, ध्येय, व्याप्ती, परिणामकारकता आणि आवश्यकता याविषयी अनेक दृष्टीकोन आहेत. प्रत्यक्षात लोकशाहीचे कितीतरी 'प्रकार' व 'नमुने' आपल्याला पहावयास मिळतात. उदा. उदारमतवादी सामाजिक, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, संघटनात्मक, अनेकात्मक आणि श्रेष्ठीजनवादी, इ. पण त्यांचा विचार करण्यापूर्वी लोकशाहीची संकल्पना व त्याच्या सिद्धांतांचा उहापोह करणे आवश्यक आहे.

लोकशाहीच्या सिद्धांतांच्या मुळाशी लोकशक्तिची (Popular Power) संकल्पना आहे. सर्वंकषवादी राज्यात निर्णय लोकांवर थोपविले जातात. त्यासाठी लोकसंमती आवश्यक मानली जात नाही. पण लोकशाहीमध्ये सत्ताधारी हे जनतेला उत्तरदायी असतात. लोकशाहीत लोकसंमतीमुळे शासनाला अधिमान्यता प्राप्त होते.

जेथे प्रत्यक्ष लोकशाही (direct democracy) आहे, तेथे जनतेचा सहभाग अधिक असतो. लोक सभांमधून महत्वाच्या विषयांवर सामूहिक निर्णय घेतात. प्राचीन ग्रीसमध्ये अथेन्स राज्यात या प्रकारची लोकशाही होती. भारतात 'ग्रामसभा' हे सुद्धा प्रत्यक्ष लोकशाहीचेच उदाहरण आहे. सार्वमत (referendum) आणि प्रत्यावर्तन (recall) ही प्रत्यक्ष लोकशाहीची साधने मानली जातात. याउलट, अप्रत्यक्ष वा प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये (indirect democracy) शासन हे जननिर्वाचित प्रतिनिधींच्या मार्फत चालविले जाते. निवडणूकीच्या माध्यमातून निर्वाचित झालेले प्रतिनिधी शासन आणि जनता यांच्यातील दुवा असतात. निर्वाचन पद्धतीमुळे जनतेचे प्रतिनिधींवर नियंत्रण असते आणि सत्तेच्या दुरुपयोगालाही आळा बसतो.

लोकशाहीमध्ये राजकीय समतेवर आधारित शासन प्रस्थापित होते. तसेच असे गृहीत मानले जाते की,

Scanned with CamScanner

सर्व लोकांमध्ये सामूहिक निर्णय करण्याची क्षमता आहे. कोणत्याही एका व्यक्तिचे मत व हित हे दुसऱ्या व्यक्तिच्या मत वा हितापेक्षा मोठे मानले जात नाही. म्हणजेच 'एक व्यक्ति एक मत' हे तत्त्व पाळले जाते. राजकीय प्रक्रियेतून कोणालाही वगळले जात नाही. लोकशाहीत प्रौढ मताधिकार सर्वांना देण्यात येतो. पण हा अधिकार सहजासहजी मिळालेला नाही. त्यासाठी अनेक संघर्ष इतिहासात घडले. युरोप व अमेरिका खंडात प्रारंभीच्या काळात मताधिकार केवळ मालमत्ताधारक गोऱ्या लोकांपुरता मर्यादित होता. काळाच्या ओघात सुशिक्षीत नागरिक, नोकरदार गोरे लोक, कृष्णवर्णीय लोक आणि सरते शेवटी स्त्रियांना मताधिकार प्राप्त झाला.

लोकशाहीत हे गृहीत मानले जाते की, कोणत्याही विषयावर मतमतांतरे आणि हितसंबंधांची विभिन्नता आहे. पण ही विविधताच लोकशाहीची शक्ति आहे आणि सर्व मतांविषयी सहिष्णुता हा तिचा स्थायीभाव आहे. लोकशाही समाजात अप्रिय वा विरोधी मतांचादेखील आदर राखला जातो. म्हणूनच लोकशाहीत नागरिकांना अभिव्यक्ति स्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य आणि संचार स्वातंत्र्य इ. दिले जाते. लोकांना शासनावर टीका करण्याचा किंवा निषेध व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण सर्वांना समान अधिकार मिळाला म्हणजे प्रत्येकाचा निर्णयप्रक्रियेत समान प्रभाव आहे असा अर्थ होत नाही. एखाद्या उद्योगपतीचा आणि गरीब शेतकऱ्याचा नितीनिर्धारण प्रक्रियेवर समान प्रभाव पडतो का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. म्हणून लोकशाहीमध्ये लोकांमध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या घटकांचे निर्मूलन झाले पाहिजे. वर्तमान स्थितीमध्ये शक्तिचे विषम वाटप हा लोकशाहीतील मोठा अडथळा आहे. हा अडथळा दूर झाला पाहिजे. लोकशाहीमध्ये निर्णयाचे स्वरुप कसे असावे? या प्रश्नावर सातत्याने वाद होतात. लोकशाहीत बहुमताचा निर्णय मान्य केल्या जातो. पण त्यामुळे अल्पसंख्याकांच्या गळचेपीचा प्रश्न निर्माण होतो. लोकशाहीत सर्वसंमतीने निर्णय व्हावेत ही अपेक्षा आहे. पण संमिश्र आणि विषमता असलेल्या समाजांमध्ये ते शक्य होत नाही.

## ■ प्रत्यक्ष सहभागात्मक लोकशाही ■
## (Direct Participatory Democracy)

चवथ्या व पाचव्या शतकामध्ये प्राचीन ग्रीक नगरराज्य असलेल्या अथेन्समध्ये प्रत्यक्ष लोकशाही होती. अथेन्सचे नागरिक कायदा निर्मिती, अंमलबजावणी आणि न्यायदान अशी शासनाची सर्व कार्ये पार पाडीत असत. खुल्या सभांमध्ये न्यायालयीन व अन्य निर्णय घेतले जात असत. त्यामध्ये नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग राहात असे. प्रशासकीय अधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड केली जाऊन कोणालाही कायमस्वरुपी नियुक्त केल्या जात नव्हते. उच्च दर्जाची राजकीय सक्रियता आणि राजकीय दायित्व हे अथेन्समधील लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे लक्षण होते. राजकीय घडामोडींमध्ये सहभागी होणे हे पवित्र कर्तव्य मानले होते. अथेन्समधील नागरिकांसाठी समाजाचे कल्याण हे सर्वोच्च ध्येय होते. त्यांचे स्वतःचे वेगळे ध्येय ते मानीत नसत. राज्य आणि समाज यांमध्ये कोणताही भेद मानला गेला नव्हता. राज्याचा विकासातच आपला विकास आहे असे नागरीक मानत होते.

रोमन गणराज्यात देखील अथेन्समधील प्रत्यक्ष लोकशाहीची संकल्पना काही प्रमाणात अस्तित्वात होती. नागरी जीवनात लोकांचा प्रत्यक्ष सहभाग, समाजाप्रती दायित्वाची भावना, व्यक्तिहितापेक्षा समाजहिताचे श्रेष्ठत्व ही लक्षणे रोमन कालखंडात आढळून येत होती.

फ्रेंच विचारक रुसोवर प्रत्यक्ष लोकशाहीचा मोठा प्रभाव होता. १८व्या शतकात युरोपीयन राज्यांमध्ये उदयास येत असलेल्या निर्वाचीत लोकशाही आणि प्रतिनिधीत्वाच्या पद्धतींवर रुसोने टीका केली. रुसोच्या मते, नागरिकांना लोकशाहीतच स्वातंत्र्य मिळू शकते. स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव नसून व्यक्तिच्या

Scanned with CamScanner

हितांची पूर्तता आहे. जर नागरिक प्रत्यक्ष समाजाच्या जडणघडणीत सहभागी होत असतील तरच ते खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहेत. कायदानिर्मितीमधून जनतेच्या इच्छेची अभिव्यक्ति होते. रुसोच्या मते, व्यक्तिच्या विकासासाठी तिचा लोकशाहीत सहभाग आवश्यक आहे. पण व्यक्तिचे स्वार्थी हेतू नसावेत.

रुसोने वैयक्तिक इच्छा आणि सामूहिक इच्छा (General Will) यामध्ये भेद मानला. सामूहिक इच्छा ही सर्व व्यक्तिंच्या वैयक्तिक इच्छांची गोळाबेरीज नाही. जेव्हा लोक आपले वैयक्तिक हेतू बाजूला ठेवून समाजाच्या हितासाठी एकत्र येतात, तेव्हा सामूहिक इच्छा निर्माण होते. सामूहिक इच्छेच्या आज्ञापालनात खरे स्वातंत्र्य आहे. इतकेच नव्हे तर सामूहिक इच्छेचे आज्ञापालन करण्यास लोकांना बाध्य केले जाऊ शकते असेही प्रतिपादन रुसोने केले आहे.

प्रत्यक्ष लोकशाहीचा हा प्रकार अत्यंत आकर्षक वाटत असला तरीही त्यामधील एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा की अथेन्समधील लोकशाहीव्यवस्था ही विषमतेवर आधारलेली होती. कारण केवळ नागरिकांना राजकीय व शासकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार होता. पण स्त्रिया, गुलाम आणि परकीयांना वगळण्यात आले होते. मात्र पुरुष गुलामांना त्यांचे शारिरीक श्रम व आर्थिक स्थितीच्या आधारावर गुलामगिरीतून मुक्त करण्याची व्यवस्था होती. ॲरिस्टॉटलनेदेखील नैसर्गिक विषमतेच्या आधारावर स्त्रिया आणि गुलामांना राजकीय समता नाकारली होती. रुसोनेसुद्धा स्त्रियांना राजकीय सहभाग घेण्यापासून दूर ठेवले. घरगुती काम हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र असून सार्वजनिक कार्यात सहभागी झाल्यास त्यांचे घरकामाकडे दुर्लक्ष होईल असे रुसोचे प्रतिपादन होते.

रुसोने मांडलेल्या सामूहिक हिताच्या कल्पनेमुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर अतिक्रमण होऊ शकते. इतकेच नव्हे तर विविध समुदाय आणि संस्कृती असलेल्या समाजासाठी सुद्धा 'सामूहिक हिताची' संकल्पना घातक आहे.

## ■ उदारमतवादी लोकशाही ■

जगातील लोकशाही व्यवस्था असलेल्या देशांमध्ये उदारमतवादी लोकशाही हा सर्वाधिक प्रचलित प्रकार आहे. परंतु उदारमतवादी लोकशाहीमध्ये अनेक विचारप्रवाह इतिहासात निर्माण होऊन गेले आहेत. त्यांचा विचार थोडक्यात करावा लागेल.

## ■ संरक्षणात्मक लोकशाही ■
## (Protective Democracy)

प्रारंभीच्या काळात उदारमतवाद्यांच्या मते, नागरिकांच्या अधिकारांचे राजांच्या जुलुमापासून संरक्षण करणे हे लोकशाहीचे ध्येय होते. उदार मतवाद हा प्रामुख्याने सामंतशाहीतून भांडवलवादाच्या संक्रमणावस्थेमध्ये उदयाला आला. या प्रक्रियेमध्ये १६व्या शतकापासून मध्यमवर्गीयांनी राजांच्या तसेच सामंतांच्या निरंकुश अधिकारांवर लगाम लावण्यास सुरुवात केली.

या ध्येयाला पूर्ण करण्यासाठी व्यक्तिवादाचा उदय झाला आहे. त्यानुसार सर्व व्यक्ति स्वायत्त आणि स्वतंत्र आहेत, आणि आपल्या जीवनाचे ध्येय स्वतः ठरवू शकतात. प्रत्येक व्यक्तिला स्वतःचे ध्येय, मूल्ये व प्राथमिकता आहेत. पण व्यक्तिला ध्येयपूर्तीसाठी पोषक वातावरणाची गरज असते. त्यासाठी जीवित, स्वातंत्र्य आणि मालमत्तेचा हक्क असले पाहिजे. हे मूलभूत अधिकार प्राप्त असल्यास व्यक्तिला सर्वाधिक स्वातंत्र्य प्राप्त होईल. त्यामुळे या अधिकारांचे संरक्षण करण्याच्या हेतूने समाजातील सर्व व्यक्ति एकत्रित होतात असे उदारमतवाद्यांचे प्रतिपादन आहे.

Scanned with CamScanner

उदारमतवाद्यांनी राज्य व नागरी समाजात भेद मानला. तसेच व्यक्तिचे खाजगी व सार्वजनिक जीवनही वेगवेगळे मानले. सार्वजनिक क्षेत्र हे राजकारणाचे क्षेत्र आहे. त्यामुळे तेथे सामूहिक निर्णय घ्यावे लागतात. तर कुटुंब, संघटना इ. नागरी समाजाचे घटक आहेत. या क्षेत्रांमध्ये व्यक्ति-व्यक्तिमध्ये स्पर्धा, संघर्ष तसेच सहकार्य पहावयास मिळते. हे संघर्ष सोडविण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. ती निर्माण करुन व्यक्तिच्या अधिकारांचे रक्षण करणे हे राज्याचे कार्य आहे. व्यक्तिंनी एकमेकांच्या अधिकारांचे अतिक्रमण करु नये यासाठी राज्याला दंडशक्तिचा (coercive power) अधिकार दिला जातो. राज्य केवळ निष्पक्ष मध्यस्थाची भूमिका निभावत असून त्याला नागरी समाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

परंतु राज्य आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करुन अधिकारांवर अतिक्रमण करेल अशीही भीती उदारमतवाद्यांना वाटत होती. मध्यमवर्गीयांवर सामंतशाहीची असलेली जुलमी अधिसत्ता ढिली पडावी असेही त्यांना वाटत होते. तात्पर्य, एका मजबूत परंतु मर्यादित शासनाची आवश्यकता होती. पण या शासनाला लोकांची संमती प्राप्त होणे गरजेचे होते. म्हणजे अशा व्यवस्थेची आवश्यकता होती की ज्यामध्ये लोकसंमत शासन असेल आणि त्यावर लोकांचे नियंत्रण असेल. या व्यवस्थेला निर्माण करण्याच्या ध्येयाला समोर ठेवून उदारमतवाद्यांनी लोकशाहीचा स्विकार केला.

उदारमतवाद्यांनी प्रातिनिधीक लोकशाहीचा पुरस्कार केला. शासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि व्यक्तिच्या अधिकारांचे रक्षण होण्यासाठी राजकीय सहभाग महत्त्वाचा मानण्यात आला. निवडणूकीच्या माध्यमातून लोकांनी आपले प्रतिनिधी निवडण्याची पद्धत स्विकारण्यात आली. या प्रतिनिधींना राजकीय निर्णय करण्याचा अधिकार असतो. विशिष्ट कालावधीनंतर होणाऱ्या निवडणुकांमुळे लोकांचे प्रतिनिधींवर नियंत्रण असते. शासनाचे अधिकार व कार्य हे संविधानाने निश्चित दिलेले असतात. तसेच संविधानाद्वारे 'कायद्याचे अधिराज्य' (Rule of Law), मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणि निष्पक्ष न्यायव्यवस्था यांसाठी तरतूद केली असते. सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये यासाठी शासनाच्या तीन अंगांमध्ये सत्ता नियंत्रण व संतुलन साधण्यात येते आणि सत्ताविभाजनाचे तत्त्व अंमलात आणले जाते.

जरी प्रातिनिधीक लोकशाही समतेच्या तत्वावर आधारीत असली तरीही प्रारंभीच्या काळात राजकीय अधिकार थोड्या लोकांपुरते मर्यादित होते. 'समुहाची झुंडशाही' निर्माण होईल अशी अनेक उदारमतवाद्यांना भीती होती. जॉन लॉक, जेम्स मिल, मॅडीसन आणि माँटेस्क्यू यांच्यासारखे विचारकदेखील सार्वत्रिक मताधिकाराच्या विरोधात होते. लॉकने मतदानाचा अधिकार मालमत्ताधारकांपुरता मर्यादित असावा असे सांगितले. जॉन स्टुअर्ट मिलने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे समर्थन केले असले तरी त्यासाठी त्याने शैक्षणिक पात्रता आवश्यक मानली. सुशिक्षीत व्यक्तिला अधिक मते देण्याचा अधिकार असावा असेही मिलने सांगितले. जर जनतेला मताधिकार दिला तर त्याचा दुरुपयोग होऊन संपत्तीच्या वितरणावर विपरीत परिणाम होईल अशी भीती प्रस्थापितांना वाटत असे. भारतात संविधान अंमलात आल्यानंतर अनेक जमीनदारांनी शासनाच्या जमीनधारणा नितीविरुद्ध न्यायालयात खटले दाखल केले होते. कारण यासंबंधी शासनाची नीती मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करीत आहे अशी त्यांची ओरड होती. म्हणून व्यक्तिगत अधिकारांवर बंधन न टाकणारे लोकांचे राज्य या अर्थाने लोकशाही ही स्वातंत्र्याच्या विरोधी मानल्या गेली. येथे 'उदारमतवादी' आणि 'लोकतांत्रिक' अशा दोन घटकांमधील अंतर्विरोध पाहता येतो.

फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांतीनंतर लोकशाही संघर्षांचा प्रारंभ झाला. १९व्या तसेच २०व्या शतकात श्रमिक वर्ग, अश्वेतवर्णीय आणि स्त्रियांनी मताधिकार मिळावा यासाठी संघर्ष केले. सार्वत्रिक मताधिकार सर्वत्र मान्य झाल्यामुळे आपल्याला आजच्या स्वरुपातील लोकशाही पहावयास मिळत आहे.

Scanned with CamScanner

## जॉन मिल आणि विकासात्मक लोकशाही

व्यक्तिगत अधिकारांचे रक्षण आणि सत्तेच्या दुरुपयोगावर अंकुश हे उदारमतवादी लोकशाहीचे प्रमुख ध्येय आहे. व्यक्तिला आपल्या हितसंबंधांना सत्तेसमोर मांडता यावे तसेच सत्ताधारकांवर अंकुश ठेवता यावा यासाठी तिचा राजकीय सहभाग आवश्यक मानण्यात आला. पण या सहभागाचे व्यक्तिच्या विकासासाठी काही मूल्य आहे असे मानले गेले नाही. जेम्स मिलचे (James Mill) असे मत होते की, राजकीय सहभागामुळे व्यक्तिच्या स्व-हिताच्या कार्यात अडथळा उत्पन्न होतो. म्हणून ज्यांचे हितसंबंध हे इतरांच्या हितांमध्ये समाविष्ट आहेत, त्यांना मताधिकार देण्यात येऊ नये. मिलने स्त्रियांना मताधिकारापासून वगळले. इतकेच नव्हे तर ज्यांचे वडील हितसंबंधांचे प्रतिनिधीत्व करु शकतात, अशा तरुणांना देखील मताधिकारापासून दूर ठेवावे असे सुचविले.

परंतु जॉन स्टुअर्ट मिलचे विचार जेम्स मिलच्या विचारांच्या उलट होते. जॉन मिलच्या मते, प्रातिनिधीक शासनपद्धतीत जास्तीत जास्त लोकांचा राजकीय सहभाग असावा. त्यामुळे लोकांचा स्व-शासन करण्याचा आत्मविश्वास वाढतो. लोकशाही हा व्यक्तिविकासाचा एक मार्ग आहे. सुसंवाद घडून येण्यासाठी सहभाग हा उत्तम मार्ग आहे. जर सखोलतेने अनेक विषयांवर चर्चा घडल्या तर मतपरिवर्तनाला वाव असतो. अशा चर्चांमधून सर्वोत्तम पर्याय येऊन संपूर्ण समाजाचे हित साध्य होते. म्हणून मिलच्या मते, पार्लमेंट हे सर्व प्रकारच्या मतांना स्थान मिळवून देणारे व्यासपीठ आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी आर्थिक-सामाजिक समता असावी असेही त्याचे मत होते. जरी मिलने लोकांच्या राजकीय सहभागाचे समर्थन केले असले तरीही प्रत्येक व्यक्तिच्या शासनक्षमतेविषयी त्याला शंका होती. कारण शासन करण्यासाठी कौशल्याची गरज आहे असे मत त्याने मांडले. यावर उपाय म्हणून स्थानिक स्तरावर लोकांचा जास्तीत जास्त राजकीय सहभाग असावा, म्हणजे लोकांना शासन करण्याचे प्रशिक्षण प्राप्त होऊ शकेल असे मिलने सुचविले.

## नीती निर्धारण आणि बहुलवादी दृष्टीकोन

उदारमतवादी लोकशाहीमध्ये निर्णयप्रक्रिया ही सर्व व्यक्तिंच्या निर्णयांचा एकत्रित परिणाम आहे. पण त्यामध्ये शासन कोणाचे असावे याचा निर्णय करता येत असला तरीही शासनाच्या नीतींवर नियंत्रण होत नाही. पण आजच्या काळात शासनावरील कामाचा भार वाढत असल्यामुळे, नीती निर्धारण या विषयाकडे अधिक लक्ष देण्यात येत आहे. उपयोगितावाद्यांनी 'अधिकतम् लोकांचे अधिकतम् सुख' हे शासनकार्यांचे मूलसूत्र मानले. त्यांनी शासनाला कमी कार्यक्षेत्र देऊन मुक्त बाजारपेठेचे समर्थन केले. पण कल्याणकारी कार्यांत उदा. शिक्षण व वेतन विषयक सुधारणा राज्याचा हस्तक्षेप मान्य केला. लोकशाही कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेत मात्र शासनाला अधिक जबाबदारी व कार्ये सोपविण्यात आली. सामाजिक सुरक्षा, शिक्षण, उद्योगांचे नियमन, इ. सर्व क्षेत्रांमध्ये शासनाचा हस्तक्षेप योग्य मानण्यात आला.

लोकांचा नीतीनिर्धारणावर प्रभाव कसा पडतो? या प्रश्नाचे उत्तर बहुलवादी सिद्धांतामध्ये आहे. बहुलवादाचे समर्थक असलेल्या रॉबर्ट डाल्ह (Robert Dahl) यांच्या मते 'निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे शक्ति आहे.' आपल्या हितसंबंधांची जपणूक करण्यासाठी लोक गट वा संघटना स्थापन करतात. त्यांच्या द्वारे हितसंबंधांची पूर्ती करण्याचा आणि पोषक नीती शासनाने स्विकाराव्या असे प्रयत्न केल्या जातात. उदा. किसान सभा, शिक्षक, विद्यार्थी व स्त्रियांच्या संघटना, कामगार संघटना, उद्योजकांच्या संघटना, इ. राजकारणामध्ये निर्णय-प्रक्रिया ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया असून त्यामध्ये अनेक घटक कार्यरत असतात. लोक आपल्या पद आणि प्रतिष्ठेचा उपयोग करतात. धर्म, जाती शिक्षण,

Scanned with CamScanner

संघटनकौशल्य यांचाही वापर करतात. श्रेष्ठीजनवादी आणि मार्क्सवादी मानतात त्याप्रमाणे शक्ति ही विशिष्ट वर्गाची नसून ती संपूर्ण समाजात विखुरलेली आहे.

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला हितसंबंधांचे संसूचन करण्याचा, समर्थन मिळविण्याचा आणि प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार आहे. सक्रीय हितसंबंधी गट सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवतात. लोकशाहीमध्ये विशिष्ट संस्थात्मक प्रक्रिया होतात; लोकांचे प्रतिनिधीत्व होते; तसेच कार्यपालिका ही विधीमंडळास जबाबदार असते. सर्वांना मूलभूत स्वातंत्र्याचा हक्क दिल्या जातो. तसेच निष्पक्ष न्यायव्यवस्थेची निर्मिती केली जाते. जोपर्यंत ही लक्षणे अस्तित्वात आहेत तोपर्यंत त्या व्यवस्थेची लोकशाही म्हणून ओळख कायम असते.

बहुलवादी सिद्धांताने हे प्रतिपादन केले आहे की, सर्व आधुनिक लोकशाही व्यवस्थांमध्ये अनेक शक्तिंचा हितासाठी परस्पर संघर्ष होतो. पण सामाजिक व आर्थिक विषमतांमुळे दुर्बल घटकांचा नीतीनिर्धारणावर प्रभाव पडत नाही. उदा. भूमिहीन मजूरांच्या संघटनेचा प्रभाव उद्योजकांच्या संघटनेपेक्षा कमी असणार हे निश्चित आहे. रॉबर्ट डाल्हने देखील हे मान्य केले की, विषमतेमुळे लोकशाहीमध्ये काही गट हे वंचित राहू शकतात. लोकशाहीमध्ये विविध दृष्टीकोन तसेच हितांचा खुला संघर्ष होतो. तसेच हे लोकशाहीकरिता योग्य मानल्या जातो. हे जरी खरे असले तरी त्याचा परिणाम मात्र लोकशाहीच्या विरोधी असू शकतो.

उदारमतवादानुसार, सर्व व्यक्तिंच्या पर्यायांचा आणि प्राथमिकतांचा सकल परिणाम साध्य करणे हे लोकशाहीचे ध्येय आहे. हे कार्य दोन प्रकारे होऊ शकते. पहिले म्हणजे निवडणूक व संविधानात्मक शासन पद्धतीच्या माध्यमातून गैरजबाबदार आणि मनमानी शासनावर अंकुश बसू शकतो. दुसरे म्हणजे हे कार्य समाजातील हितसंबंधी गट, राजकीय पक्ष आणि दबाव गट करतात.

आज उदारमतवादी लोकशाही विजय आणि संकटाच्या उंबरठ्यावर उभी आहे. एकीकडे कम्युनिस्ट जगताचे पतन झाले आहे. त्यामुळे पूर्वकम्युनिस्ट देशांमध्ये उदारमतवादी लोकशाहीला प्रवेश शक्य झाला आहे. पश्चिम आशियामध्ये लष्करी हस्तक्षेप करुन लोकशाही व्यवस्था स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेच्या सर्वमान्यतेवर शिक्कामोर्तब झालेले आहे. उदारमतवादी लोकशाहीतील प्रातिनिधीक शासनपद्धती, कायद्याचे अधिराज्य, व्यक्तिचे मूलभूत अधिकार, निवडणूका तसेच अनेक पक्षपद्धती ही लक्षणे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेकरिता मौलिक व आवश्यक झालेले आहेत. फुकूयामाने असे प्रतिपादन केले आहे की, उदारमतवादी लोकशाहीला अन्य कोणताही पर्याय नाही. पण दुसरीकडे उदारमतवादी लोकशाहीवर समाजवादी, स्त्रीमुक्तिवादी तसेच बहुलसंस्कृतीवादी सातत्याने टीका करताना दिसून येत आहेत. त्यांचा विचार पुढे केला जाईल.

## ■ लोकशाहीवरील आक्षेप ■
## (Objections to Democracy)

लोकशाहीवर प्रामुख्याने दोन प्रकारे टीका केली जाते. पहिली म्हणजे काही टीकाकारांना लोकशाहीतील विशिष्ट कार्यपद्धती पटत नाही आणि त्यावर अधिक सखोल चिंतन आवश्यक आहे असे ते मानतात. दुसरे म्हणजे अनेक टीकाकारांचे लोकशाहीतील सिद्धांतांवर आक्षेप आहेत.

लोकशाहीवर प्रमुख आक्षेप असा आहे की, लोकशाहीमध्ये अकार्यक्षम शासन निर्माण होते. अथेन्समधील लोकशाहीवर टीका करताना प्लेटोने असे म्हटले की, शासन करण्यासाठी तज्ज्ञ व कुशल व्यक्तिंची आवश्यकता असते. प्रत्येक व्यक्तिला शासन करता येते असे समजणे चुकीचे आहे. कारण तसे झाल्यास अज्ञान व अकार्यक्षमता कायम राहील. प्लेटोच्या मते, लोकशाही हा शासनाचा चुकीचा प्रकार

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## लोकशाहीविषयक दृष्टीकोन

उदारमतवादी लोकशाहीकडे अनेक दृष्टीकोनातून पाहिले जाते. अनेक विचारकांनी विविध दृष्टींनी विचार करुन उदारमतवादी लोकशाहीला पर्याय सुचविण्याचे प्रयत्न केले आहेत.

## समाजवादी दृष्टीकोन (Socialist View)

श्रेष्ठीजनवाद्यांप्रमाणे समाजवादी विचारकसुद्धा असे मानतात की, लोकशाहीतसुद्धा मूठभर लोकांचे हितसंबंध जपण्यासाठी राजकीय शक्तिचा उपयोग केला जातो. उत्पादनांच्या साधनांवर नियंत्रण असल्याने या थोड्या लोकांचे समाजात वर्चस्व कायम राहते. त्यामुळे विषमता ही नैसर्गिक नसून विशिष्ट सामाजिक व आर्थिक व्यवस्थेमुळे निर्माण झाली आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नियोजीत मार्गाने विषमता निर्माण केली जाते. एकीकडे राजकीय समतेवर आधारीत लोकशाही आणि दुसरीकडे वैयक्तिक स्वातंत्र्य व बाजारपेठेतील अर्थव्यवस्थेचे समर्थन करणारी भांडवलशाही यातील विसंगतीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न समाजवाद्यांनी केला आहे. खाजगी मालमत्ता आणि संपत्तीच्या विषम वितरणामुळे समाजात आर्थिक-सामाजिक विषमता निर्माण होते. त्यामुळे लोकांच्या राजकीय स्वातंत्र्यावर बंधने येतात.

मार्क्सने राज्य हे तटस्थ संस्था आहे ही उदारमतवादी संकल्पना अमान्य केली. राजकीय शक्तिसंबंधी मार्क्स आणि एंजल्सच्या लेखनात दोन विचारप्रवाह आढळून येतात. पहिला असा की, त्यांनी राज्याला प्रस्थापित वर्गाच्या हितांचे रक्षक मानले. मार्क्सने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या ग्रंथात स्पष्ट केले की, 'राज्य हे प्रस्थापित वर्गाचा सामान्य कारभार सांभाळणारी यंत्रणा आहे.' दुसरा विचारप्रवाह असा की, मार्क्स व एंजल्सने राज्य हे प्रस्थापित वर्गाच्या नियंत्रणापासून स्वायत्त असावे असे मत मांडले. सांसदीय लोकशाहीमध्ये निवडणुकांच्या अपरिहार्यतेमुळे शासन श्रमिकांच्या काही मागण्या मान्य करते. उदारमतवादी लोकशाही राज्यांमध्ये मुक्त बाजारपेठेचे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी संपत्तीधारणेवर मर्यादा, रोजगार हमी यांसारखे उपायसुद्धा केले जातात. पण मार्क्सच्या मते, हे सर्व तात्कालिक उपाय आहेत. कारण राज्य हे भांडवलशाहीच्या दीर्घकालीन हितसंबंधांच्या विरुद्ध असू शकत नाही. म्हणून निवडणूक ही व्यवस्था बदलवू शकत नाही. तसेच विषमतेच्या मूळ कारणांनासुद्धा नष्ट करु शकत नाही.

मार्क्सवादी तसेच समाजवाद्यांनी उदारमतवादी लोकशाहीतील वैयक्तिक अधिकारांच्या स्वरुपावर कठोर टीका केली. मार्क्सच्या मते, हे अधिकार व्यक्तिला स्वार्थी व दुराभिमानी करतात. तसेच समाजापासून वेगळे करतात. प्रत्येक व्यक्ति दुसऱ्यांकडे स्पर्धा व भीतीच्या नजरेने पाहू लागते. समाजवाद्यांच्या मते सर्वांचा विकास होऊ शकेल असे मुक्त वातावरण निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी लोकशाहीमध्ये अधिक सहभागप्रधानता असावी. व्यवस्थापनांमध्ये सामूहिक निर्णयप्रक्रिया स्विकारण्यात यावी. मालक आणि श्रमिक असा भेद न करता सहकारी तत्वावर आर्थिक लोकशाही निर्माण व्हावी. साम्यवाद्यांनी क्रांतीचे समर्थन केले. तसेच एकपक्षीय पद्धतीचाही स्विकार केला. पण सामाजिक लोकशाहीमध्ये समाजवादी तत्वे आणि उदारमतवादी लोकशाही संस्था त्यांच्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थव्यवस्थेचे नियमन, रोजगाराची व्यवस्था आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिल्यास हा समन्वय साध्य होऊ शकतो.

साम्यवाद्यांनी पक्ष आणि राज्यसंस्थेत शक्तिच्या केंद्रीकरणाकडे नेहमीच दुर्लक्ष केले. पूर्व युरोप तसेच सोव्हिएट रशियामध्ये साम्यवादी व्यवस्थेच्या पतनानंतर साम्यवाद्यांनी लोकशाहीचा पुनर्विचार करण्यास प्रारंभ केला. राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वातंत्र्य यांपैकी प्राथमिकता कशाला असावी हा वादाचा

Scanned with CamScanner

प्रमुख मुद्दा राहिलेला आहे. वर्तमान डावे विचारक असे मानतात की, आर्थिक समता निर्माण करण्यासाठी उदारमतवादी लोकशाही तसेच व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पूर्णतः त्याग करण्याची आवश्यकता नाही. विषमतांना दूर करणे आणि लोकसहभाग वाढविणे ही दोन उद्दिष्टे डोळ्यासमोर असल्यास लोकशाही अधिक अर्थपूर्ण होईल. डावे विचारक असेही मानतात की, औद्योगिक शक्ति आणि गैरजबाबदार आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटनांनी जागतिक अर्थव्यवस्थेवर वर्चस्व निर्माण केले आहे. म्हणून नव-उदारमतवादी जागतिकीकरण हे आज लोकशाहीला निर्माण झालेला सर्वात मोठा धोका आहे.

## ■ लोकशाहीवर भारतीय दृष्टीकोन ■
## (Indian Debate on Democracy)

भारत तसेच तिसऱ्या जगातील देशांमध्ये वसाहतवादाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी लोकशाही संकल्पनांचा स्वीकार करण्यात आला. वसाहतवादी शोषणामुळे या देशांचे मागासलेपण कायम राहिले. कारण वसाहतींमधील साधनांचा लाभ केवळ राज्य करणाऱ्या देशांना मिळाला. पण प्रत्यक्ष वसाहतींना मात्र काहीच मिळाले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तिसऱ्या जगातील जवळपास सर्वच देशांनी गतिमान आर्थिक विकास आणि सामाजिक परिवर्तनाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले. रशियातील समाजवादी नेतृत्वाने केलेल्या कामगिरीमुळे भारतीय नेतृत्व प्रभावित झाले होते. त्यामुळे भारतातील समस्यांना समजून घेण्यासाठी समाजवादी दृष्टीकोन स्विकारण्यात आला. या विचारप्रवाहात प्रामुख्याने पंडित जवाहरलाल नेहरु आणि राम मनोहर लोहिया यांच्या विचारदृष्टी पाहणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या समाजवादी विचारांचा लोकशाहीविषयक असलेल्या दृष्टीकोनावर काय प्रभाव पडला हादेखील चर्चेचा विषय आहे.

भारतात मजबूत संवैधानिक पाया तसेच लोकशाही परंपरा निर्माण करण्यात जवाहरलाल नेहरु यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या विचारांवर १९व्या शतकातील उदारमतवादी लोकशाही परंपरा आणि २०व्या शतकातील फेबियन समाजवादाचा प्रभाव होता. तसेच त्यांना सोव्हिएट रशियात झपाट्याने झालेल्या आर्थिक परिवर्तनांचे आकर्षण होते. नेहरुंनी लोकशाहीला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय या ध्येयांना प्राप्त करण्याचा शांतीपूर्ण मार्ग मानले. त्यांच्या मते, व्यक्तिचे कल्याण हे राज्य तसेच समाजाचे सर्वोच्च ध्येय असावे. व्यक्तिचा सर्वांगीण विकास होण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. चर्चा व वादातून सत्याप्रत पोहोचता येते. तसेच सामूहिक हिताचा विचार करण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले जाऊ शकते असा नेहरुंचा विश्वास होता. त्यासाठी मुक्त सार्वजनिक चर्चा, एकमेकांच्या दृष्टीकोन व असंतोषाबद्दल सहिष्णुता असणे आवश्यक आहे. नेहरुंनी भारतात उदारमतवादी लोकशाहीचा प्रखरतेने पुरस्कार केला. नागरिकांना मूलभूत राजकीय व नागरी अधिकार, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, कायद्याचे अधिराज्य, संसदीय शासनपद्धती आणि स्वतंत्र न्यायपालिका ही उदारमतवादी लोकशाहीची अशी संस्थात्मक चौकट निर्माण झाली पाहिजे.

नेहरुंनी भांडवलवादाकडे पाहण्याचा समाजवादी दृष्टीकोनही स्वीकारला. त्यांनी राजकीय समतेबरोबर आर्थिक समतेचेसुद्धा समर्थन केले. जर आर्थिक विषमता असेल तर लोकशाही व्यवस्थेवर श्रीमंतांचे वर्चस्व प्रस्थापित होईल. म्हणून सामाजीक व आर्थिक समता निर्माण झाली तर लोकशाहीचा विकास होऊ शकतो. आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी राज्याची अर्थव्यवस्थेत सक्रिय भूमिका असावी. तसेच राज्याने नियोजन तसेच भूमीसुधार (Land reforms) यांसारखे विकासात्मक कार्यक्रम अंमलात आणावे. रशियामध्ये झपाट्याने झालेल्या आर्थिक प्रगतीचे नेहरु प्रशंसक होते. परंतु तेथील कम्युनिस्ट राजवटीत हिंसकता आणि हुकूमशाही प्रवृत्ती होती. यावर पंडितजींनी कठोरतेने टीका केली. विकासासाठी राजकीय स्वातंत्र्याचा बळी दिला जाऊ नये यावर नेहरु दृढनिश्चयी होते.

Scanned with CamScanner

पं. नेहरुंनी सामाजिक लोकशाहीचा नमुना स्वीकारण्यावर भर दिला. आंतरराष्ट्रीय राजनीतिमध्ये त्यांनी दुर्बल राष्ट्रांना स्थान मिळण्यासाठी अलिप्ततावादाचे समर्थन केले.

पं. राममनोहर लोहिया यांचे विचार पं. नेहरुपेक्षा वेगळ्या स्वरुपाचे होते. दोघांच्याही मते, भांडवलवादामध्ये विषमता उत्पादनावर आधारित संबंध तसेच तंत्रज्ञानामुळे निर्माण होते. भांडवलशाहीमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण तसेच केंद्रीत उत्पादन प्रक्रियेची आवश्यकता असते. याकरिता केंद्रीत राज्यव्यवस्था निर्माण करावी लागते. म्हणूनच भांडवलशाहीमध्ये सत्तेचे केंद्रीकरण आणि हुकूमशाहीची प्रवृत्ती असते. नेहरुंच्या मते, या प्रवृत्तीला रोखण्यासाठी व्यक्तिला मूलभूत अधिकारांची हमी असावी. तसेच सार्वत्रिक मताधिकार असावा. लोहियांनी निर्वाचन तसेच सांसदीय यंत्रणा महत्वाची मानली. पण लोकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी या यंत्रणा अपुऱ्या आहेत असे त्यांना वाटत होते. कम्युनिस्ट राज्यांमध्ये सत्तेच्या केंद्रीकरणाकडे लोहियांनी लक्ष वेधले.

जनतेच्या सक्रिय सहभाग आणि संघर्षातून सामाजिक परिवर्तन घडू शकते. लोकशाही ही लोकांना सक्षम करणारी प्रक्रिया आहे. त्यामध्ये शोषक सामाजिक व सांस्कृतिक विषमतांविरुद्ध संघर्ष होणे अपरिहार्य आहे. तसेच सत्तेच्या केंद्रीकरणाला प्रतिबंध निर्माण होणे आवश्यक आहे. लोहियांनी राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे असे प्रतिपादन केले. तसेच आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यासाठी लघुउद्योगांना प्राधान्य द्यावे असे सुचविले. लघुउद्योगांना तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर भारतीय समाजाच्या गरजा पूर्ण होऊ शकतील. म्हणजे पाश्चिमात्य भांडवलशाही देशांनी स्विकारलेली अर्थव्यवस्था भारतासाठी उपयुक्त नाही. लोहियांनी असे प्रतिपादन केले की, राज्याची सार्वभौम सत्ता चार स्तरांवर वितरीत करण्यात यावी. हे चार स्तर म्हणजे ग्राम, जिल्हा, प्रांत आणि केंद्र आहेत. सैन्य आणि महत्वाचे उद्योग केंद्राच्या अखत्यारीत असावे. लघुउद्योग जिल्ह्यांकडे असावेत, तर कृषीक्षेत्र ग्रामीण स्तरावर असावे. हे विकेंद्रीकरण केवळ कार्यकारी मंडळापुरते नसून नियोजन आणि कायदेकारी मंडळातसुद्धा लागू असावे. या व्यवस्थेमुळे समाजातील न्यूनतम घटकांचादेखील उत्पादन, मालकी, प्रशासन आणि शिक्षणक्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढेल.

लोहीयांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. कारण त्यांनी नोकरशाहीचे प्राबल्य आणि सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यासाठी सहभाग आणि विकेंद्रीकरणाचा मार्ग सुचविला.

## स्त्रीमुक्तीवादी दृष्टीकोन
## (Feminist view)

स्त्रीमुक्तिवादाच्या समर्थकांनी उदारमतवाद्यांनी केलेल्या खाजगी व सार्वजनिक या भेदावर टीका केली आहे. कारण त्यामुळे पुरुष व स्त्रीमध्ये असंतुलित शक्ति संबंध कायम राहतात. परिवारामध्ये चूल आणि मूल सांभाळण्यामध्ये स्त्रीचा मोठा वाटा आहे. पण या जबाबदाऱ्यांना कमी लेखले जाते, आणि स्त्रीयांना दुय्यम स्थान प्राप्त होते. म्हणून परिवार या संस्थेतदेखील लोकशाहीकरणाची आवश्यकता आहे. उदारमतवाद्यांच्या मते, परिवार हा खाजगी स्वरुपाचा आहे. त्यामुळे तो राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवण्यात यावा. तसेच खाजगी जीवनात लिंगभेदाच्या आधारावर श्रम व शक्तिविभाजन झाले आहे. परिणामस्वरूप सार्वजनिक क्षेत्रात देखील राजकीय स्थान व प्रतिष्ठा यांचे विषम वितरण झालेले दिसून येते. पाश्चिमात्य देशांमध्ये लोकशाहीचा दीर्घ इतिहास असला तरीही स्त्रियांना मताधिकार सर्वात शेवटी प्राप्त झाला. उदा. स्वित्झर्लंडमध्ये स्त्रियांना १९७१ मध्ये मताधिकार मिळाला. बहुतेक राजकीय विचारकांनी नैसर्गिक असमर्थता व गौणत्व या आधारांवर स्त्रियांना नागरिकत्वाचा दर्जा बहाल करण्यास नकार दिला आहे.

वैधानिकदृष्ट्या राजकीय समता असली तरीही राजकीय संस्था आणि निर्णयप्रक्रियांमध्ये स्त्रियांना योग्य प्रतिनिधीत्व मिळत नाही हे सत्य आहे.

राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढण्यासाठी काही विशिष्ट नीती अंमलात आणणे आवश्यक आहे. उदा. घरगुती जबाबदाऱ्यांचे स्त्री व पुरुषांमध्ये पुनर्वितरण व्हावे. बालसंगोपनासाठी शासनाने विशेष योजना आखाव्यात. स्त्रियांच्या विधिमंडळ वा अन्य संस्थांमधील प्रतिनिधीत्वासंबंधी कायदे व्हावेत. उदा. भारतात संसद तसेच राज्य विधिमंडळामध्ये स्त्रियांना ३३% प्रतिनिधीत्व देण्यात यावे अशा स्वरूपाचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

स्त्रीमुक्तिवाद्यांच्या मते, स्त्रियांना समानतेची हमी देण्यासाठी त्यांच्यासाठी विशेष स्थान निर्माण होणे आवश्यक आहे. पण लोकशाही सिद्धांतामध्ये सर्व भेद नष्ट करून समानता निर्माण करण्याचा भर देण्यात आला आहे. त्यामुळे राजकीय समानतेच्या संकल्पनेत भेदभावाला कोणतेही स्थान नाही. भेदभावामुळे शोषित वा वंचित घटक निर्माण होतो. त्यामुळे भेदभाव नष्ट झाले पाहिजे असे लोकशाही सिद्धांत मानतो. म्हणजे स्त्रीमुक्तिवाद्यांची स्त्री-पुरुष भेद मान्य करण्याची भूमिका आणि लोकशाहीतील समानतेची संकल्पना यांच्यात अंतर्विरोध आहे. स्त्रीमुक्तिवाद्यांच्या मते, उदारमतवादानुसार स्त्री व पुरुष यांच्यात भेद करतानासुद्धा पुरुषप्रधानताच श्रेष्ठ मानली जाते. उदा. राजकारण हे केवळ पुरुषांचे क्षेत्र मानले गेले असून स्त्रियांना आपली शक्ती व कणखरता सिद्ध करावी लागते. म्हणून स्त्री-पुरुष भेदाचा विचार करताना लोकशाही सिद्धांतांनी स्त्रियांच्या वास्तविक जीवनाकडे डोळेझाक केली आहे. स्त्री-पुरुषांसाठी एकच मापदंड लावणे चुकीचे असून स्त्रीवर्गावर अन्याय करण्यासारखे आहे. सारांश, स्त्रीमुक्तिवाद्यांच्या मते, लोकशाही सिद्धांतामध्ये मूलत: पुरुषांना स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ मानलेले आहे. या दोन वर्गांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी त्यांच्यातील भेद समजून ते सामावून घेणे आवश्यक आहे.

## ■ लोकशाहीतील काही महत्त्वाचे वाद ■
## (Key Debates in Democratic Theory)

वर्तमान लोकशाही सिद्धांतामध्ये असलेले काही महत्वपूर्ण विवादाच्या विषयांचा उहापोह करणे आवश्यक आहे.

### ■ लोकशाही आणि भेदभाव
### (Democracy and Discrimination)

ऐतिहासिकदृष्ट्या, लोकशाही ही भेदभावांना नष्ट करणारी चळवळ आहे. लोकशाहीत गृहीत धरले जाते की, सर्वांना समान राजकीय अधिकार व नागरिकत्व बहाल केल्यामुळे जातपात, लिंग, वंश, धर्म, इ. आधारावर असलेले भेद नष्ट होतील. तसेच लोकशाहीत सर्व व्यक्तिंना नैतिकदृष्ट्या समान मानले जाते. पण समतेच्या संकल्पनेत भेदभावाची संकल्पनासुद्धा समाविष्ट करावी लागेल या स्त्रीमुक्तिवाद्यांच्या भूमिकेचा विचार या आधी केलेला आहे.

स्त्रीमुक्तिवाद्यांप्रमाणेच बहुलसंस्कृतीवादाच्या (Multiculturism) समर्थकांनी आपली भूमिका मांडली आहे. त्यांच्या मते, सांस्कृतिक विविधता असलेल्या समाजामध्ये सर्व समूहांना समान वागणूक दिल्यास बहुसंख्यांक वर्गाच्या संस्कृतीला श्रेष्ठत्व प्राप्त होऊन अन्य समूहांच्या संस्कृती गौण ठरतील. वर्तमानकालीन समाजांमध्ये सांस्कृतिकदृष्ट्या विविधता असलेले समूह एकत्र राहताना दिसून येतात. उदा. स्थानिक समूह, स्थलांतरित समूह, वांशिक वा धार्मिक अल्पसंख्यांक समूह, इ. भारतात अनेक धर्म,

Scanned with CamScanner

भाषा, संस्कृती तसेच आदिवासी समाजांचेही अस्तित्व आहे. या समूहांमध्ये केवळ सामाजिक, सांस्कृतिक भेद नसून त्यांच्यात परस्पर श्रेष्ठत्व वा गौणत्वाचे संबंध असल्याचे दिसून येते. उदारमतवादी लोकशाहीमध्ये धर्म किंवा संस्कृतीला वैयक्तिक मानण्यात आले आहे. परंतु कोणत्याही देशातील कायदा व व्यवहारामध्ये बहुसंख्यांक संस्कृतीचे प्राबल्य असल्याचे दिसून येते. स्त्रीमुक्तिवादी तसेच बहुलसंस्कृतीवाद्यांच्या मते, उदारमतवादामध्ये स्वहिताचा विचार करणाऱ्या व्यक्तिला गृहीत धरून चांगल्या जीवनाची संकल्पना मांडण्यात आली आहे. पण ही संकल्पना सर्वांसाठी लागू होऊ शकत नाही. उदा. आदिवासी समूहांमध्ये मालमत्तेवर सामूहिक हक्क मान्य असून खाजगी मालमत्तेची संकल्पना मूलतः मान्य नाही.

उदारमतवादामध्ये केवळ वैयक्तिक स्तरावर विविधता मान्य केलं आहे. पण व्यक्तिची ओळख विशिष्ट सांस्कृतिक संदर्भामुळे प्रस्थापित होते. त्यामुळे संस्कृतीला विचारात न घेतल्यास व्यक्ति आणि समूह या दोन्ही घटकांना दुर्लक्षित केल्यासारखे होईल. संस्कृती व समूहांना स्थान दिले तरच व्यक्तिला स्थान प्राप्त होईल. जर विविधतेला स्विकारले तरच लोक आपल्या क्षमतांचा विकास करुन समाजाला योगदान देऊ शकतील. जर केवळ बहुसंख्यांकांच्या संस्कृतीला प्रमाण मानले तर तो अन्य संस्कृतींवर अन्याय होईल. कारण प्रस्थापित संस्कृतीला मान्य नसणाऱ्या अन्य संस्कृतींना आपले अस्तित्व गमवावे लागते अथवा मुख्य प्रवाहाच्या बाहेर जाण्यावाचून गत्यंतर नसते.

लोकशाहीमध्ये समान प्रमाण व्यवस्था (standard) निर्माण करण्यावर भर असतो. परंतु लोकशाहीत स्वीकारलेली प्रमाण व्यवस्था सर्वत्र मान्य होईलच असे नाही. एखादी व्यवस्था विशिष्ट प्रदेशात वा परिस्थितीत योग्य असू शकते. पण अन्यत्र ती स्वीकारली जाईलच याची हमी नसते. उदा. आदिवासी जमाती आपल्या जंगलातील वास्तव्याला पर्यावरणास पोषक असे सह–अस्तित्व मानतात. तसेच त्याची तुलना 'विकास' म्हणून सांगण्यात येणाऱ्या विनाशक औद्योगीकरणाशी करतात.

लोकशाहीमध्ये वेगवेगळे भेद समजून घेण्यासाठी विशिष्ट यंत्रणा व प्रक्रिया असणे आवश्यक आहे. आयरिस यंग (Iris young) यांच्या मते सर्व शोषित व अल्पसंख्यांक गटांसाठी अतिरिक्त प्रतिनिधीत्वाची तरतूद असावी या गटांना विकसित होण्यासाठी सार्वजनिक निधी उपलब्ध व्हावा, अशा गटांसंबंधी नीतीनिर्धारण करण्यापूर्वी त्यांच्याशी चर्चा व विचारविनिमय करण्यात यावा. तसेच एखादी संबंधित नीती वा निर्णय नाकारण्यासाठी नकाराधिकार प्राप्त असावा. विल किमलिका (Will Kymlicka) या विचारकाने स्थानिक गटांना स्वयंशासनाचा तसेच वांशिक गटांना सांस्कृतिक अधिकार असावे असे मत मांडले आहे. या संदर्भात येथे नमूद करावे लागेल की, डिसेंबर २००५ मध्ये लोकसभेने एक विधेयक पारित केले आहे. त्यानुसार जंगलवासियांचा वन्य आणि खनिज स्त्रोतांवर अधिकार मान्य करण्यात आला आहे.

परंतु वरील उपाय व सूचना अंमलात आणल्यास काही धोके उद्भवतात. उदा. एखाद्या गटाची साचेबद्ध ओळख कायम होण्याची शक्यता असू शकते. तसेच त्या गटाची विशिष्ट ओळख कायम राहून अन्य सर्व वैशिष्ट्ये वा ओळखी (Identities) नेहमीकरिता पुसल्या जाण्याची शक्यता असते. दुसरा प्रश्न या गटांमधील अंतर्गत लोकशाहीचा आहे. गटामध्ये कोणत्या व्यक्ति वा समूहाचे प्रतिनिधीत्व योग्य मानावे हा प्रश्न निर्माण होतो. उदा. भारतात सर्व धर्मांमधील व्यक्तिगत कायदा व्यवस्थेऐवजी समान नागरी कायदा लागू करण्यात यावा की नाही यावर विवाद आहे. परंतु सर्व धर्मांच्या व्यक्तिगत कायद्यांमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त आहे. त्यामुळे एखाद्या गटाचा स्वत:ची ओळख कायम राखण्याचा अधिकार आणि त्या गटात स्त्रियांना समान अधिकार देण्याचा प्रश्न यांच्यात अंतर्विरोध निर्माण होतो.

अशा प्रकारे भेदांना जाणून घेणे आणि त्यांना सामावून घेणे हे लोकशाही सिद्धांतासमोर असलेले आव्हान आहे.

Scanned with CamScanner

## प्रतिनिधीत्व आणि सहभाग
## (Representation and Participation)

बहुतेक लोकशाही व्यवस्थांमध्ये जनप्रतिनिधीत्वाचे तत्व मान्य करण्यात आले आहे. परंतु प्रतिनिधीत्व करणे म्हणजे काय? प्रतिनिधींनी जनतेच्या इच्छांना व्यक्त करावे असा त्याचा अर्थ आहे काय? प्रादेशिक निर्वाचन क्षेत्रांमध्ये विविध हितसंबंधांना सामावून घेणे हे एक आव्हानच असते. जॉन स्टुअर्ट मिलने जनप्रतिनिधींची भूमिका जनतेच्या इच्छा व्यक्त करण्यापुरती मर्यादित आहे या मताला विरोध केला आहे. मिलच्या मते, प्रतिनिधींना स्व-विवेकानुसार कृती करण्याचे स्वातंत्र्य असावे. तसेच लोकांचे आपल्या प्रतिनिधींवर कसे नियंत्रण असावे हादेखील प्रश्न आहे. या विषयी दुसरा दृष्टीकोन असा आहे की, लोक एखाद्या व्यक्तिला किंवा राजकीय पक्षाला विशिष्ट नीति अंमलात आणण्यासाठी निवडून देतात. म्हणजे ते शासनाचे दिशादर्शन करतात. पण बहुतेक राजकीय पक्षांचे जाहीरनामे सामान्य व मोघम स्वरुपाचे असतात. त्यामध्ये कोणतीही निश्चित नीति स्पष्ट केलेली नसते. निवडणूकीत राजकीय पक्ष सर्वच हितसंबंधांना सामावून घेण्याचा प्रयत्न करतात. सर्वच पक्षांमध्ये श्रेष्ठीजनांचे वर्चस्व असते. कोणीही नीतीनिर्धारणासंबंधी भूमिका स्पष्ट करण्यास तयार नसते. वर्तमानकाळात निवडणूकप्रक्रियेवर प्रसारमाध्यमांचा मोठा प्रभाव दिसून येतो. याशिवाय बहुतेक देशांमध्ये बहुमतपद्धतीने किंवा प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीने निवडणुका घेतल्या जातात. बहुमत पद्धतीच्या निवडणूकीत विजयी पक्षाला अनेकदा जनतेचे बहुमतसुद्धा प्राप्त झालेले नसते. पक्षाने जिंकलेल्या जागा आणि त्याने प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या मतांची टक्केवारी यामध्ये विसंगती दिसून येते. अशा प्रकारे निवडणूक हे प्रतिनिधीत्वाचे मुख्य माध्यम असतानासुद्धा ते जनतेच्या इच्छा व अपेक्षांना नीति व निर्णयांमध्ये परिवर्तीत करण्यास अपुरे ठरते.

या सर्व कारणांमुळे सहभाग या विषयावर पुन: वैचारिक मंथन सुरु झाले आहे. जनप्रतिनिधींवर नियंत्रण करण्यासाठी आणि सत्तेच्या दुरुपयोगाला आळा घालण्यासाठी नागरिकांनी सक्रियतेने सहभागी होण्याची आवश्यकता आहे. नोकरशाहीचे प्राबल्य, भ्रष्टाचार, केंद्रीकरणाची प्रवृत्ती, अपारदर्शकतेचा तसेच जबाबदारीचा अभाव या सर्व समस्यांचे उत्तर सहभागप्रधानतेमध्ये सापडू शकते. या दृष्टीने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाही यांवर पुनर्विचार प्रारंभ झाला आहे. भारतात माहितीच्या अधिकाराचा कायदा हे या दृष्टीने टाकलेले एक पाऊल आहे. या कायद्यामुळे शासनाचे व्यवहार अधिक पारदर्शी होतात.

परंतु सहभागप्रधानतेची समस्या अशी आहे की मोठ्या व विविधतापूर्ण समाजात परिणामकारक सहभाग निर्माण होणे कठीण आहे. तरीपण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रसारमाध्यमे व इंटरनेटसेवा सर्वत्र पोहोचली आहे. त्यामुळे या माध्यमांद्वारे जनतेचा सहभाग वाढला आहे. स्थानिक स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण तसेच जागृत नागरिक मंडळामुळे जनतेचा वाढता सहभाग शक्य झाला आहे. मूळ मुद्दा असा आहे की, प्रातिनिधीक आणि सहभागप्रधानतेच्या यंत्रणेमध्ये समन्वय निर्माण होणे आवश्यक आहे.

## लोकशाही व विकास
## (Democracy and Development)

भारतीय लोकशाहीला एक चमत्कारच मानले जाते. कारण तीव्र विषमता, दारिद्र्य आणि बेरोजगार यासारख्या भीषण समस्यांमध्येदेखील ती टिकून राहिलेली आहे. पण भारतात लोकशाहीमुळे विकासाची गती अत्यंत मंद असल्याची वारंवार टीका केली जाते. भारतात विकासासाठी 'कणखर व सशक्त नेतृत्वाची इतकेच नव्हे तर एखाद्या हुकूमशहाची सत्ता असणे आवश्यक आहे,' असाही सूर ऐकावयास मिळतो.

Scanned with CamScanner

लोकशाही ही गरीब देशांना न परवडणारी चैन आहे. तसेच ती विकासात अडथळे निर्माण करणारी आहे, अशी आलोचनासुद्धा केली जाते. लोकशाहीवर होत असलेल्या या स्वरुपाच्या टीकेला 'लीचा सिद्धांत' म्हणून ओळखले जाते. सिंगापूरचे माजी प्रधानमंत्री ली कुआन यु ह्यांनी असे प्रतिपादन केले की, राजकीय व नागरी अधिकार मर्यादा असल्यास आणि सर्वंकषवादी सत्ता असल्यास आर्थिक विकास झपाट्याने होऊ शकतो. कम्युनिस्ट राजवटींनी राजकीय स्वातंत्र्यापेक्षा आर्थिक हक्कांना प्राधान्य दिले आणि तीव्र गतीने प्रगती साधली हे सर्वांना माहित आहे.

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन ह्यांनी लोकशाहीवरील आलोचनेला अमान्य करुन ''ली सिद्धांत'' नाकारला आहे. त्यांच्या मते, दारिद्र्य असलेल्या समाजांमध्ये विकासाच्या प्रक्रियेत लोकशाहीची विधायक भूमिका आहे. लोकशाहीत शासकांना निवडणूकीत जनतेला सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांना जनतेची गाऱ्हाणी व अपेक्षांना ऐकून घेणे भाग आहे. राजकीय स्वातंत्र्य, नागरी अधिकार, स्वतंत्र प्रसारमाध्यमे, विरोधी पक्षांचे अस्तित्व- या सर्व घटकांच्या अस्तित्वामुळे शासनाचे समाजाकडून सातत्याने मूल्यांकन व आलोचना होत असते. या प्रक्रियेचा सत्ताप्राप्तीच्या स्पर्धेत असणाऱ्या व्यक्ति व पक्षांवर परिणाम होतो. जनतेच्या आर्थिक गरजा जाणून घेण्यासाठी लोकशाही उपयुक्त आहे. लोकशाही अनेक क्षेत्रांमध्ये संधी निर्माण करते. मुक्त चर्चा, वाद-विवाद यांच्या माध्यमातून जनता आपल्या गरजा आणि प्राथमिकता व्यक्त करु शकते.

सेन यांनी मांडलेला दृष्टीकोन महत्त्वपूर्ण आहे. कारण विकास म्हणजे काय यावर अनेक विचारप्रवाह आहेत. आर्थिक प्रगती म्हणजे विकास आहे या मताला पर्यावरणवादीसुद्धा विरोध करतात. नर्मदा बचाव आंदोलनासारख्या चळवळींनी औद्योगीकरण आणि विशाल धरणे व प्रकल्पांमुळे मिळणाऱ्या लाभांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. अनेक स्थानिक व आदिवासी समूहांनी त्यांच्या लाभासाठी नैसर्गिक स्रोतांचा वापर करण्याच्या अधिकाराचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते, विकासाचा कोणताही एक निश्चित नमुना असू शकत नाही. म्हणून अनेक सामाजिक व पर्यावरणवादी चळवळींनी विकासासाठी पर्यायी, जनकेंद्रीत आणि पोषक नमुना निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. जर विकासाचा अर्थ जीवनमानात सुधारणा करणे असा असेल तर विकासाचा कोणता मार्ग स्विकारावा हे लोकशाही निर्णय प्रक्रियेने निश्चित होणे आवश्यक आहे.

## लोकशाहीची व्याप्ती
## (The Scope of Democracy)

समाजवादी, स्त्रीमुक्तिवादी, बहुलसंस्कृतीवादी आलोचकांनी तसेच जातीयता विरोधी आणि वांशिकताविरोधी चळवळींनी समाजातील असमानता आणि शक्तिच्या विविध स्तरावरील संरचनांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. या शक्तिसंरचनांचा प्रभाव लोकांच्या राजकीय स्वातंत्र्यावर तसेच सामूहिक निर्णय प्रक्रियेवर होतो. जर या संरचना नष्ट झाल्या तर लोकशाहीसाठी ते घातक ठरु शकते. म्हणून लोकशाही व्यवस्था निर्माण होण्यासाठी लोकशाही समाज असणे आवश्यक आहे. समतेच्या संकल्पनेत केवळ औपचारिक समता अपेक्षित नसून संधीची समानताही समाविष्ट आहे. तसेच सांस्कृतिकदृष्ट्या विविधता असलेल्या समुदायांना समान वागणूक देणे हेसुद्धा अपेक्षित आहे. त्यामुळे लोकशाहीची व्याप्ती वाढू शकते.

मनुष्याच्या सामाजिक जीवनातील सर्व क्षेत्रांमध्ये लोकशाहीचे महत्त्व आहे. समाजात लोकशाही खोलवर रुजण्यासाठी जनसहभाग वाढला पाहिजे. तसेच प्रादेशिक व स्थानिक स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. लोकशाहीची संकल्पना केवळ राष्ट्रांपुरती मर्यादित नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या

Scanned with CamScanner

युगात उत्पादन, संसूचन आणि व्यापार या क्षेत्रांमध्ये सर्व राष्ट्रांना परस्परांवर निर्भर राहावे लागत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी तसेच जागतिक बँक यांसारख्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटनांचा जगाच्या अर्थव्यवस्थेवर तसेच तिसऱ्या जगातील देशांवर मोठा प्रभाव आहे. पर्यावरण संरक्षण व मानवी सुरक्षा यांसारख्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये सहकार्याची गरज आहे. तर मानवाधिकारांचे उल्लंघन तसेच शांतता यासारख्या समस्या सुटण्यासाठी आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. आज संयुक्त राष्ट्रसंघ आणि विश्व व्यापार संघटन (WTO) यांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटना शक्तिशाली देशांची बाजू घेताना दिसतात. या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर प्रभावी व लोकशाही स्वरुपाची व्यवस्था विकसित होणे आवश्यक आहे. डेव्हिड हेल्ड (David Held) यांनी लोकशाहीव्यवस्थेचा असा नमुना सुचविला आहे की ज्यामध्ये जागतिक व प्रादेशिक स्तरावर राजकीय, वैधानिक, प्रशासकीय संस्था स्थापन केल्या जातील. त्यामुळे शासनामध्ये पारदर्शकता व जबाबदारी हे गुण विकसित होतील. काही महत्त्वाच्या विषयांवर जागतिक स्तरावर सार्वमत घेणे शक्य होईल. तसेच राष्ट्रांमध्ये शांतता व मानवाधिकारांची जपणूक करता येईल. लोकशाहीव्यवस्थेचा हा नमुना पर्यायी राहणार नसून तो राष्ट्रीय व स्थानिक स्तरावर पूरक म्हणून कार्य करेल.

## चर्चेकरिता मुद्दे :

१. जगाच्या अनेक प्रदेशांमध्ये स्वयं – निर्णयाच्या चळवळी सुरू आहेत. ह्या समस्या सोडविण्यासाठी लोकशाही तत्वांचा उपयोग होऊ शकेल काय?
२. लोकशाहीच्या संरक्षणासाठी पहिले जागतिक महायुद्ध लढल्या गेले. आज जगातील अनेक देशांमध्ये अमेरिकन महासत्ता लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करताना दिसून येते. एखाद्या देशावर लोकशाही थोपविणे शक्य आहे काय?
३. भारतात समान नागरी कायदा लागू करावयाचा एखाद्या समुदायाचे सांस्कृतिक अधिकार आणि महिलांचे समानतेचे अधिकार यांच्यातील संघर्ष लोकशाही पद्धतीने सोडविता येईल काय?

Scanned with CamScanner

प्रकरण १६

# राष्ट्रवाद

सुमालिनी कुमार

**रूपरेषा :**

विषय प्रवेश
संकल्पनेचा इतिहास
गैर-युरोपीय राष्ट्रवाद
सैद्धांतिक प्रश्न
विश्लेषण आणि समीक्षा
सारांश

Scanned with CamScanner

## विषय प्रवेश

जर आपण जगाच्या नकाशावर नजर टाकली तर आपल्याला जगातील सर्व भूप्रदेश राष्ट्रवादामुळे विभागलेला दिसून येईल. पण जगात अशी स्थिती नेहमीच होती असे नाही. आपल्याला आज अस्तित्वात असलेली राष्ट्रे स्वाभाविक, प्राचीन आणि कायमस्वरूपी राजकीय व्यवस्था वाटतात. पण प्राचीन ग्रीसमध्ये नगरराज्ये होती. प्राचीन भारतात गणराज्ये आणि राजेशाही होती. रोमन साम्राज्यापासून युरोपमध्ये राजघराण्यांचे साम्राज्य राहिलेले आहे. वस्तुतः राष्ट्रवाद हा केवळ २०० वर्षे जुना आहे।

जर ऐतिहासीक दृष्ट्या राष्ट्रवाद इतका नवा आहे तर तो अत्यंत शक्तिशाली आणि सार्वत्रिक तत्त्व म्हणून कसा समोर आला? त्याचा उगम कोठे व कसा झाला आणि जगात त्याचा प्रसार कसा झाला? राष्ट्रवाद आणि आधुनिक राज्यात काय संबंध आहे? प्रकरणाच्या पहिल्या भागात या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत. राष्ट्रवादाबाबत काही सैद्धांतिक प्रश्नदेखील आहेत. राष्ट्रवादाचा आधुनिक संस्कृती आणि भांडवलवादाशी काय संबंध आहे? राष्ट्रवाद ही प्रगत होत जाणारी वा ऱ्हास होत जाणारी राजकीय प्रक्रिया आहे काय? प्रकरणाच्या दुसऱ्या भागात या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राज्यशास्त्रात राष्ट्रवादाचा अन्य संकल्पनांप्रमाणे सखोल अभ्यास करण्यात आलेला नाही. अनेक विचारकांनी त्यावर लेखन केलेले असले तरीही अध्ययनाचे एक क्षेत्र म्हणून राष्ट्रवादाकडे पाहिल्या गेलेले नाही. राष्ट्रवाद म्हणजे काय याविषयी विचारकांमध्ये मतभिन्नता आहे. राष्ट्रवादाच्या पैलूचे ऐतिहासीक आणि सैद्धांतिक अध्ययन केल्यास वरील प्रश्नांची अधिक चांगल्या पद्धतीने उत्तरे मिळू शकतील.

समान इतिहास, परंपरा, भाषा आणि संस्कृती यांमुळे एकत्र असलेला लोकसमूह म्हणजे राष्ट्रवाद आहे. असा लोकसमूह स्वतःचा सार्वभौम राजकीय समुदाय म्हणजेच राष्ट्र निर्माण करतो. या दृष्टीने राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक, भाषिक, वांशिक आधारावर एकजिनसी असलेला लोकसमुदाय आहे. जरी आज जगातील कोणतेही राष्ट्र वरील निकष पूर्ण करीत नसेल तरीही 'राष्ट्र' ही संकल्पना सर्वत्र अत्यंत प्रभावी आहे. अनेकदा 'राष्ट्र' आणि 'राज्य' या संज्ञा समान अर्थाने वापरल्या जातात. परंतु त्या विभिन्न अर्थाच्या आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. स्वतःला राष्ट्र मानणाऱ्या प्रत्येक लोकसमुदायाचे आपले राज्य असले पाहिजे या सर्वसामान्य समजामुळे वरील गोंधळ निर्माण होतो. म्हणूनच 'राष्ट्र-राज्य' ही संज्ञा निर्माण झाली आहे. हॅन्स कोहन यांच्या मते, 'राष्ट्रवाद हा राष्ट्र-राज्याची मागणी करतो आणि राष्ट्र-राज्याच्या निर्मितीमुळे राष्ट्रवाद प्रबळ होतो.' मॅक्स वेबर यांच्या मते, राष्ट्र हा असा भावनाशील समुदाय आहे की जो स्वतःला राज्याच्या रूपाने साकार करतो. राष्ट्रवाद हा असा विचार वा चळवळ आहे की जो राष्ट्र-राज्य स्थापन करू इच्छितो. सामान्यतः असे मानले जाते की राज्यात सर्व व्यक्ती व गटांची राष्ट्राप्रती निष्ठा असणे महत्त्वाचे आहे. लोक राष्ट्रनिष्ठ असलेच पाहिजे. सर्वांची राष्ट्रासाठी प्राण अर्पण करण्याची तयारी असली पाहिजे. ऐतिहासिक दृष्ट्या राष्ट्रवादाचा आधुनिक राज्याशी संबंध आहे. त्याचे अध्ययन करणे आवश्यक आहे.

### ■ संकल्पनेचा इतिहास ■

इतिहासकारांच्या मते राष्ट्रवादाचा उगम हा पश्चिम युरोपमध्ये झाला आणि त्यानंतर त्याचा जगाच्या अन्य भागात प्रसार झाला. जरी राष्ट्रवाद १८व्या व १९व्या शतकात उदयाला आलेला असला तरी १८व्या शतकातील युरोपखंडात घडलेल्या काही राजकीय व लष्करी घटनांनी राष्ट्रवादाच्या उदयाला अनुकूल

परिस्थिती निर्माण केली. त्यामध्ये प्रामुख्याने रोमन साम्राज्याचा ऱ्हास आणि ब्रिटीश व फ्रेंचांमधील शंभर वर्षांच्या युद्धाचा अंत या घटना समाविष्ट आहेत.

परंतु १६व्या व १७व्या शतकात युरोपमध्ये आधुनिक राज्याचा उदय हे राष्ट्रवादाच्या उदयाचे प्रमुख कारण आहे. राष्ट्रवादाचा राज्यसंस्थेशी संरचनात्मक संबंध आहे. त्याशिवाय राष्ट्रवाद उदयाला येऊ शकला नसता. म्हणून सर्वप्रथम राज्याचा उदय कसा झाला ते समजून घेणे आवश्यक आहे. आधुनिक राज्य हे आधुनिकतापूर्व राजकीय संरचनांपेक्षा वेगळे आहे. कारण आधुनिक राज्य हे केंद्रीत, सार्वभौम आणि अविभाज्य स्वरुपात असलेली शक्ति आहे. मध्ययुगीन युरोपमध्ये राजकीय शक्ती ही विभाजीत स्वरुपात होती. जरी राजेशाही अस्तित्वात असली तरीदेखील चर्चच्या धार्मिक सत्तेचा आणि सामंतांचा राजकीय शक्तिमध्ये वाटा होता. चवथ्या शतकात रोमन सम्राट कॉंस्टंटाईन याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यापासून चर्चची सत्ता वाढतच गेली. रोमन साम्राज्यात ख्रिश्चन धर्म हा राजधर्म झाल्यामुळे संपूर्ण साम्राज्यात चर्चच्या सत्तेचा प्रसार झाला. सहाव्या शतकापर्यंत कॅथॉलिक चर्चचे अधिकारक्षेत्र आणि युरोपातील अन्य राजेशाहींचे अधिकारक्षेत्र यांच्यामध्ये परस्पर अतिक्रमण होऊ लागले. दैवी अधिकाराच्या नावाखाली राजांनी आपल्या सत्तेचे समर्थन केले तर दुसरीकडे चर्चने जनतेवर राजकीय नियंत्रण करण्यास सुरुवात केली. उदा. चर्चने जनतेवर कर बसविण्याचा अधिकार आपल्या हाती घेतला. मध्ययुगीन युरोपमध्ये राजकीय सत्ता आणि धार्मिक सत्तांची सरमिसळ होऊ लागल्याने त्यापैकी कोणतीही सत्ता सर्वशक्तिमान होऊ शकत नव्हती.

सामंतवादी व्यवस्थेमुळे राजसत्तेवर एक प्रकारे नियंत्रण होते. मध्ययुगीन युरोपमध्ये सामंतवाद ही सामाजिक व्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेमध्ये वरिष्ठांनी नेमून दिलेली कामे पूर्ण करणे हे कनिष्ठांचे दायित्व असे. तसेच प्रत्येकाला त्याच्या श्रेणीनुसार कामे सांगितली जात असत. सामंतवादी व्यवस्था राजकीय आणि आर्थिक अशा दोन्ही स्तरांवर कार्य करीत असे. मध्ययुगीन युरोपीय राजेशाहीमध्ये प्रामुख्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्था होती. त्यामुळे व्यक्तिचा दर्जा हा तिच्याजवळ असलेल्या भूमीवरुन ठरविला जात असे. त्यामुळे जमीनदार आणि भूमीहीन मजूरांमध्ये विषमता असणे स्वाभाविक होते. त्यामुळे सरंजामशाही व्यवस्थेत मालक आणि गुलाम अशी आर्थिक दरी निर्माण झाली. राजकीय दृष्ट्या सामंतांचा राजाच्या सत्तेमध्ये वाटा होता.

आधुनिकता-पूर्व युरोपमध्ये अनेक कारणांमुळे एका विशिष्ट भूप्रदेश आणि लोकसंख्येमध्ये राजकीयदृष्ट्या केंद्रीत समुदाय निर्माण होऊ शकला नाही. सर्वात महत्त्वाचे कारण असे की, राजाची सत्ता ही मर्यादित होती. तसेच राजसत्ता ही चर्चची सत्ता आणि सामंतांची सत्ता यांचा विचार करता 'समानांमध्ये प्रथम' मानली जात असे. चर्चची लोकांच्या निष्ठा आणि आज्ञाधारकतेवर पकड होती. युरोपमध्ये व्यक्तिची चर्चप्रति असलेली निष्ठा ही राजाप्रति असलेल्या निष्ठेपेक्षा श्रेष्ठ मानली जात असे. राजांना करवसुली आणि दैनंदिन प्रशासकीय कार्यासाठी सामंतांवर अवलंबून राहावे लागत होते. दळणवळण आणि संसूचनाच्या योग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे राजांना त्यांच्या सत्तेमध्ये वाटा मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हती. राजांना सामंतांवर सातत्याने अवलंबून राहावे लागत असे. परिणामी सामंतांकडून बंडाळी होण्याची भिती ही नेहमीच राजांना भेडसावत असे. राजा, सरंजामदार आणि जहागीरदारांमध्ये युद्ध तसेच विजय-पराभवाची मालिका सतत सुरु असल्याने राजकीय समीकरणे बदलत असत. त्यामुळे कोणत्याही राजकीय समुदायाच्या भौगोलीक सीमा सुरक्षित राहणे शक्य नव्हते. दुसरे म्हणजे दोन राजघराण्यांमध्ये वैवाहीक संबंध जुळल्यास एका राजाने दुसऱ्या राजाला मोठ्या प्रमाणात भूमी भेटस्वरुपात देण्याची परंपरा प्रचलित होती. त्यामुळे एखाद्या राजविवाहानंतर आतापर्यंत एका राजाच्या आधिपत्याखाली असलेली जनता अकस्मात दुसऱ्या राजाच्या नियंत्रणाखाली जात असे. निवास वा नागरिकत्वाचे कोणतेही निश्चित नियम अस्तित्वात नसल्यामुळे जनतेलासुद्धा काम करण्यासाठी, रहिवासासाठी किंवा विवाहासाठी दुसऱ्या राजांच्या राज्यात जाण्याची मुभा होती. अशा प्रकारे राजकारण, प्रशासन, कायदा आणि संस्कृती इ. सर्व

Scanned with CamScanner

क्षेत्रांमध्ये विकेंद्रीकरण असल्यामुळे सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनामध्ये स्थानिक विविधता आणि वैशिष्ट्ये कायम राहिली. बदलत्या राजकीय परिस्थितीचा त्यांच्या जीवनावर कोणताही मोठा परिणाम होत नसे. युरोपमध्ये भाषा, व्यवहार आणि परंपरांमध्ये मोठी विविधता होती. केंद्रीय सत्तेचे अस्तित्व नसल्यामुळे स्थानिक प्रथा व परंपरांचा प्रभाव कायम होता. त्यामुळे युरोपमध्ये एकजिनस सांस्कृतिक ओळख असणारे लोकसमुदाय निर्माण झाले नव्हते. पण आधुनिक राष्ट्रवादात मात्र अशी ओळख असणे आवश्यक आहे.

काळाच्या ओघात युरोपमध्ये परिस्थिती बदलत गेली आणि परिणामत: सामंतवादी सत्ता तसेच चर्चच्या सत्तेचा ऱ्हास होऊन त्या कोलमडून पडल्या. त्याला प्रमुख कारण म्हणजे युरोपमध्ये निरंकुश राजेशाहीचा उदय झाला. (उदा. इंग्लंडमधील ट्यूडर राजघराणे तसेच फ्रान्समध्ये ब्युरबॉन राजघराण्याची सत्ता) त्यांनी नव्याने उदयाला येत असलेल्या व्यापारी व उद्योजक वर्गाच्या मदतीने राजकीय सत्ता आपल्या हाती केंद्रीत केली. प्रारंभिक आधुनिक युरोपमध्ये व्यापार आणि भांडवलशाही हे संपत्तीचे प्रमुख स्त्रोत बनले. त्यामुळे राजांना करवसुलीसाठी सरंजामदार आणि जहागीरदारांच्या कृषी उत्पन्नावर अवलंबून राहण्याची गरज बऱ्याच प्रमाणात कमी झाली. परिणामत: सामंतवादाची जागा भांडवलशाहीने घेतली. सरंजामदार आपली राजकीय सत्ता गमावून बसले आणि राजांचे निरंकुश वर्चस्व स्थापन झाले. ह्याच कालखंडात १५व्या शतकातील धार्मिक सुधारणांमुळे कॅथॉलीक चर्चच्या सत्तेला मोठा धक्का बसला. १६व्या शतकापर्यंत या दोन्ही सत्तांच्या ऱ्हासामुळे राजांचे संपूर्ण राज्यातील जनतेवर प्रत्यक्ष आणि परिणामकारी नियंत्रण प्रस्थापित झाले. राजांनी कठोरतेने प्रादेशिक सीमांच्या मर्यादा अंमलात आणल्या. धर्म, शिक्षण आणि भाषा यांबाबत लोकांमध्ये एकसमान दर्जा निर्माण केला. तसेच लोकांची राजाप्रति निष्ठा कायम राहावी म्हणून रहिवास आणि संचारासंबंधी नवे नियम अंमलात आणले. निरंकुश राजतंत्राचे वर्तमान राज्यसंस्थेशी बरेच साधर्म्य आहे- निरंकुश राजतंत्रामध्ये सार्वभौमसत्ता, केंद्रीय शासन आणि प्रादेशिक सीमा निश्चित होत्या. तरीपण ती राज्ये आधुनिकतापूर्व संस्थेकडून म्हणजेच राजेशाहीद्वारे चालत होती. म्हणूनच फ्रान्सचा लुई १६वा हा राजा, 'मी म्हणजे राज्य' असे म्हणत असे.

निरंकुश राजांनी आपापल्या राज्यांना प्रादेशिक सीमा निर्माण करुन एक प्रकारे राष्ट्रनिर्मितीचा पायाच रचला. सांस्कृतिक, भाषिक आणि वांशिकदृष्ट्या एकजिनस असलेले लोकसमुदाय विशिष्ट प्रदेशांमध्ये एकत्र राहू लागले. पश्चिम युरोपात नव्याने उदयाला येत असलेल्या श्रेष्ठीजन वर्गामध्ये हळूहळू राष्ट्रवादी भावना जागृत होऊ लागली. व्यापारी व भांडवलदार असलेल्या श्रेष्ठीजनांचे राजाला सहकार्य होते. परंतु लवकरच या वर्गामध्ये अधिक राजकीय अधिकार आणि प्रतिनिधीच्या मागणीवरुन असंतोष निर्माण झाला. कारण या वर्गाने पार्लमेंट तसेच प्रातिनिधीक सभांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्यातून युरोपमध्ये राजा आणि पार्लमेंटमध्ये संघर्ष निर्माण झाला. १६८८ मधील इंग्लंडमधील रक्तहीन राज्यक्रांती हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या संघर्षामध्ये समाजातील श्रेष्ठीजनांमध्ये राष्ट्रवादाच्या संकल्पनेने चांगले मूळ धरले. १८व्या शतकात औद्योगिक क्रांतीनंतर सरंजामवादी सामाजिक आणि राजकीय व्यवस्था कोलमडत होत्या. अशावेळी राष्ट्रवादाने समाजातील श्रेष्ठीजन वर्गाला एकत्रित आणण्याचे कार्य केले. आधुनिक काळातसुद्धा एकसंध राहिलेला तसेच एकजीनस आणि प्राचीन असलेला राजकीय समुदाय या अर्थाने 'राष्ट्र' ही संज्ञा वापरल्या जाऊ लागली. या समुदायाचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे अशी भावना निर्माण होऊ लागली.

सर्वसामान्य जनतेमध्ये राष्ट्रवाद कसा लोकप्रिय झाला? या प्रश्नाचे उत्तर असे की, राजकीय सत्तेचा विरोध करण्यासाठी जनतेला राष्ट्रवाद उपयुक्त ठरु लागला. श्रेष्ठीजन वर्गाकडून समर्थन कमी होत आहे असे पाहून राजांनी अधिक जुलूमी व निरंकुश पद्धतीने राज्यकारभार करणे सुरु केले. परिणामत: सामान्य जनतेने राजेशाहीचा प्रखर विरोध केला. उदा. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती. युरोपमध्ये १८व्या आणि १९व्या शतकांत झालेल्या क्रांती वा बंडाळीमध्ये राष्ट्रवादी संकल्पनेचा वारंवार उच्चार होऊ लागला. जनतेचे समर्थन जरी कमी-अधिक होत असले तरी या चळवळींचे नेतृत्व मात्र श्रेष्ठीजन वर्गाच्या हाती कायम होते.

Scanned with CamScanner

१९व्या शतकाच्या शेवटापर्यंत निरंकुश राजेशाहीचे मर्यादीत आणि संवैधानिक राज्यव्यवस्थांमध्ये रुपांतर झाले. तेथे लोकशाही व्यवस्था स्थापन झाल्या. आधुनिक युगात जनमानसामध्ये राष्ट्रवाद ही लोकप्रिय विचारधारा झाली. तरीपण युरोपच्या विविध प्रदेशांमध्ये ऐतिहासीक, सांस्कृतिक आणि भौगोलीक विभिन्नतांमुळे राष्ट्रवादाची वेगवेगळी रुपे पहावयास मिळतात. उदा. इंग्लंडच्या तुलनेत फ्रान्समध्ये हिंसात्मक चळवळी अधिक प्रमाणात घडून आल्या. युरोपच्या काही भागात राष्ट्रवादाचा प्रसार बऱ्याच उशीरा म्हणजे १९व्या शतकात झाला. याचे प्रमुख कारण या प्रदेशांमधील विभिन्न भौगोलीक आणि सांस्कृतिक परिस्थिती आहे. उदा. इंग्लंड हे भौगोलिक दृष्ट्या युरोपपासून वेगळे असल्यामुळे तेथे एका वेगळ्या राष्ट्राच्या संकल्पनेने आकार घेतला. पण जेथे बहुभाषिक आणि बहुवंशीय साम्राज्यांचे राज्यांमध्ये रुपांतर झाले. तेथे 'राज्य' आणि 'राष्ट्र' यांच्यामध्ये नेहमीच अर्थाबाबत गोंधळाची स्थिती कायम राहिली. प्रारंभी मोठी साम्राज्ये ही बहुराष्ट्रीय राज्यांमध्ये रुपांतरीत झाली. त्यानंतर त्यांचे लहान-लहान स्वतंत्र राष्ट्रांमध्ये विभाजन होत गेले. परंतु या दीर्घ प्रक्रियेमध्ये नेहमीच मोठ्या प्रमाणात हिंसाचार आणि संघर्ष झालेला दिसून येतो. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे जुन्या ऑस्ट्रो-हंगेरीयन साम्राज्याच्या अवशेषातून निर्माण झालेल्या बोस्निया आणि हर्जेगोविन्हा या राष्ट्रांचा इतिहास आहे. या प्रदेशांमध्ये केवळ राष्ट्र-राज्यांची मागणी करण्यासाठी राष्ट्रवादाचा उदय झाला. १९व्या शतकात जुन्या रोमन साम्राज्यातील काही गणराज्यांमधून वेगळ्या जर्मन राष्ट्रराज्याची निर्मिती करण्यात आली.

## ■ गैर-युरोपीय राष्ट्रवाद ■

१९व्या शतकाच्या शेवटपर्यंत युरोपमध्ये राष्ट्रवादाचा चांगला प्रसार झाला. तसेच त्याचा जगाच्या अन्य भागातदेखील प्रसार होण्यास प्रारंभ झाला. त्यासाठी प्रामुख्याने व्यापार व वसाहतवाद ही दोन कारणे आहेत. १८व्या शतकाच्या प्रारंभी युरोपीयन राज्यांनी व्यापार वाढविण्यासाठी जगभर बाजारपेठा काबीज करण्याचे धोरण स्वीकारले. आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका या खंडांमध्ये युरोपीयन राज्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यामुळे तेथील स्थानिक जनतेचा बाहेरील जगातील आचार-विचारांशी परिचय झाला. वस्तुत: युरोपीय वसाहतवादी राज्ये स्वत:च आपल्या पतनाला कारणीभूत ठरल्या. कारण राष्ट्रवादाचे वारे युरोपातून अन्य खंडांमध्ये प्रसारित झाले. ज्याप्रमाणे युरोपात निरंकुश राजेशाहींविरुद्ध जनक्रांती झाल्या त्याचप्रमाणे वसाहतींमध्ये देखील वसाहतवादी देशांच्या अन्याय्य आणि भेदभावपूर्ण राजवटींविरुद्ध जनतेचा असंतोष व्यक्त होऊ लागला. प्रारंभीच्या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व हे सुशिक्षीत आणि व्यावसायीक मध्यमवर्गीयांच्या हाती होते. पण हळुहळु त्या चळवळींमध्ये सामान्य जनतेचा सहभाग वाढू लागला. १८९० आणि १९०० च्या सुमारास भारतीय राष्ट्रीय चळवळ ही मध्यमवर्गीयांचे प्राबल्य असलेल्या काँग्रेस या संघटनेपुरती मर्यादीत होती. पण १९२० पासून या चळवळीला जनआंदोलनात परिवर्तीत करण्याचे पूर्ण श्रेय महात्मा गांधींच्या नेतृत्वाला द्यावे लागेल.

विविध राष्ट्रांमध्ये झालेल्या राष्ट्रीय चळवळींमध्ये असलेली एकतेची भावना हे देखील वसाहतवादाच्या पतनाचे एक प्रमुख कारण आहे. वसाहतींमध्ये होणारे वैचारीक आदान-प्रदान हे राष्ट्रीय चळवळींना सहाय्यकारकच ठरले. उदा. १९०५ मध्ये रशियासारख्या बलाढ्य साम्राज्याचा जपानसारख्या लहान राष्ट्राने केलेला पराभव. या घटनेमुळे संपूर्ण गैर-युरोपीय वसाहती देशांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला. महात्मा गांधींच्या असहकार चळवळीने तुर्कीमधील खिलाफत चळवळीला समर्थन व्यक्त केले. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्यवादाला आंतरराष्ट्रीय स्तरावर असणारी मान्यता हळूहळू कमी होऊ लागली. आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रीय चळवळींच्या वाढत्या प्रभावामुळे वसाहतवादी देशांना आपले वर्चस्व टिकवून ठेवणे कठीण झाले. आर्थिक दृष्ट्या वसाहतींवर राज्य करणे हे अनेक कारणांमुळे

Scanned with CamScanner

नुकसानकारक ठरु लागले. नैतिकदृष्ट्या केवळ राष्ट्रीय चळवळीकडूनच नव्हे तर युरोपातील उदारमतवादी लोकशाही राज्यांकडूनही वसाहतवादाचा विरोध होऊ लागला. या परिस्थितीमुळे दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतींना स्वातंत्र्य मिळण्यास प्रारंभ झाला. १९७५ पर्यंत आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेत अनेक नवीन राष्ट्र-राज्यांची स्थापना झाली.

## ■ सैद्धांतिक प्रश्न ■

### ■ राष्ट्रवाद आणि आधुनिक संस्कृती

राष्ट्रवाद आणि आधुनिक संस्कृतीमध्ये नेमका कशा स्वरुपाचा संबंध आहे हे पाहण्याचा प्रयत्न अनेक विचारकांनी केला आहे. कार्ल डश्च (Karl Deutsch) या विचारकाच्या मते, राष्ट्रवाद ही सांस्कृतिक आणि सामाजिक आधुनिकतेची (उदा. आधुनिक संसूचन) अभिव्यक्ति आहे. अर्नेस्ट गेलनर (Ernest Gelner) याने Nations and Nationalism या ग्रंथात सांस्कृतिक घटक आणि राष्ट्रवाद यांचा परस्परांवर होणारा परिणाम स्पष्ट केला आहे. त्याच्या मते, अनेकदा राष्ट्रवाद हा पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या संस्कृतीमधून निर्माण होतो. त्यातून राष्ट्रनिर्मिती होते. राष्ट्र ही राष्ट्रवादाला निर्माण करीत नसून त्याउलट राष्ट्रवादातूनच राष्ट्र निर्माण होते. गेलनरच्या मते, या प्रक्रियेत राष्ट्रवादाचा संस्कृतीवर प्रभाव निर्माण होतो. या संस्कृतीला एका एकजिनस राष्ट्रीय संस्कृतीमध्ये परिवर्तीत करण्याचे कार्य राष्ट्रवाद करतो. गेलनरचे हे विश्लेषण भारतात हिंदु राष्ट्रवादाच्या उदयाची प्रक्रिया समजून घेण्यास उपयुक्त ठरु शकते. हिंदुत्वाच्या संकल्पनेनुसार भारत हे असे हिंदु राष्ट्र असावे की जेथे विविध स्थानिक परंपरांचा त्याग करुन एकजिनस हिंदु संस्कृतीचा स्विकार केला गेला आहे. या संकल्पनेत केवळ उच्चवर्णीयांनी स्थापन केलेल्या सांस्कृतिक व सनातन परंपरांनाच स्थान आहे. हिंदुत्वाच्या धारणेनुसार एक समान भाषा (हिंदी), समान देवता (प्रभु रामचंद्र) आणि प्रभु रामचंद्राचे जन्मस्थान असलेल्या अयोध्येचा समान पूजास्थल म्हणून स्वीकार केला जावा. रामजन्मभूमीच्या आंदोलनात शेवटच्या मागणीचा उच्चार केला गेला. त्यातून रामजन्मभूमीवर उभ्या असलेल्या बाबरी मस्जिदीचे पतन झाले. महत्त्वाचे म्हणजे हिंदुत्वाच्या संकल्पनेत सातत्याने प्राचीन वैभवशाली वैदिक कालखंडाला हिंदु राष्ट्राचे उगम म्हणून संबोधले जाते. समान उगमस्थान वा जन्मस्थान ही संकल्पना पश्चिम युरोपातील राष्ट्रवादाच्या इतिहासात सुद्धा आढळून येते. या संदर्भात हिंदु राष्ट्रवादाचे जर्मन राष्ट्रवादाशी बऱ्याच प्रमाणात साधर्म्य आढळून येते.

गेलनरच्या मते, राष्ट्रवादाचा आधुनिक औद्योगिक समाजातील गरजांशी संबंध आहे. कृषीप्रधान समाजाची सामाजीक रचना राष्ट्रवादाच्या तत्त्वाला पोषक अशी नाही. आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थांमध्ये गतिमान आणि परिवर्तने स्वीकारणाऱ्या कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. त्यासाठी केवळ परिवाराची साधने किंवा पारिवारिक संबंध पुरेसे नाहीत. गेलनरच्या मते, आधुनिक काळातील कुशलता प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक शिक्षणव्यवस्था आवश्यक आहे. ही शिक्षणव्यवस्था एकभाषिक असावी. तसेच ती राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या केंद्रीभूत व्यवस्थेत असावी. म्हणजेच दुसऱ्या शब्दांमध्ये आधुनिक राष्ट्रराज्यामध्ये असावी. राष्ट्रवाद ही वर्तमान जगातील अशी एकमेव व्यवस्था आहे की जी आधुनिक समाजाच्या सामाजिक व भौतिक परिस्थितीशी जुळवून घेऊ शकते. म्हणूनच राष्ट्रवाद हे सार्वत्रिक तत्व आहे. दुसरे म्हणजे राष्ट्रवाद हा समाजातील नोकरी आणि राजकीय पदांसाठी झगडणाऱ्या विभिन्न गटांना एकत्र आणू शकतो. तात्पर्य, गेलनरच्या दृष्टीने राष्ट्रवाद ही औद्योगीकरणासाठी अनिवार्य अटच झाली आहे. कारण राष्ट्रवादातून लोकांना आधुनिक औद्योगिक समाज उभारण्यासाठी कष्ट सहन करण्याची प्रेरणा मिळते. म्हणून राष्ट्रवाद हा आधुनिकता आणि औद्योगिकरण या दोहांकरिता मूलभूतदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

Scanned with CamScanner

## ■ राष्ट्रवाद आणि भांडवलवाद

[illegible]

## ■ राष्ट्रवाद : पाश्चिमात्य की पौर्वात्य?

[illegible]

## ■ राष्ट्रवाद : प्रगतीकारक की अधोगतीकारक?

[illegible]

Scanned with CamScanner

मार्क्सवादी विचारकाच्या मते, राष्ट्रवाद हा श्रमिकवर्गात राज्यसंस्था तसेच राज्यकर्त्या वर्गाबद्दल निष्ठेची भावना निर्माण करतो. इतकेच नव्हे तर 'राष्ट्रांचे स्वयंनिर्णयाचे तत्व' हे सुद्धा काही काळापुरते जगातील सामान्य जनतेसाठी उपयुक्त तत्त्व होते. परंतु आधुनिक भांडवलवादी व्यवस्थेत हे तत्त्व अर्थहीन झाले आहे. अनेक विचारकांनी राष्ट्रवादाला संकुचित मानले आहे. राष्ट्रवाद केवळ एकजिनसी अस्तित्वाला मान्य करतो असे त्यांचे मत आहे. ह्याच कारणाकरिता महान कवि आणि विचारक रविंद्रनाथ टागोर हे राष्ट्रवादाबद्दल साशंक होते. पॉल गिलोरी (Paul Gilory) या विचारकाच्या मते जगात कोठेही राष्ट्रवादामुळे विविध परंपरा आणि अनुभव हे हद्दपार होतात. त्यांनी असा सिद्धांत मांडला की गुलामगिरीमुळे वांशिक स्थलांतर ही आधुनिक पाश्चिमात्य राज्यांच्या इतिहासात नेहमीच राहिलेली वस्तुस्थिती आहे. पण सर्व इंग्रज लोक श्वेतवर्णीय आहेत असा प्रचार करुन वरील कटु सत्य कायमचे पुसून टाकण्यात आले आहे. आज इंग्लंड हे जगातील सर्वाधिक बहु-भाषिक, बहुवंशीय, बहुराष्ट्रीयता असलेला देश आहे. परंतु आजही इंग्लंडमध्ये काही राष्ट्रवादी विचारक असे मानतात की मध्ययुगीन स्वरुपाच्या आणि श्वेतवर्णीय उच्च वर्गातील एकजिनसी परंपरा ह्या इंग्लंड या राष्ट्राचा मूलाधार आहेत.

राष्ट्रवादाला समर्थन देणारे अनेक विचारक आहेत. मार्क्सवादी विचारवंत एजाज अहमद यांनी अर्नेस्ट गेलनरप्रमाणे हे मान्य केले आहे की, इतिहासाच्या पानांमध्ये पारंपारिकतेकडून आधुनिकतेकडे वाटचाल होत असताना राष्ट्रवाद हा त्या प्रक्रियेतील एक टप्पा आहे. पण मार्क्सवादी दृष्टीकोनानुसार राष्ट्रवाद ही मध्यमवर्गीय विचारधारा आहे आणि आधुनिक राज्याबरोबर उदयाला आली आहे. एजाज अहमदसारख्या मार्क्सवादी विचारक असे मानतात की आधुनिक राष्ट्र-राज्य हा वर्गविहीन व राज्यविहीन समाजव्यवस्थेकडे होणाऱ्या वाटचालीतील एक आवश्यक टप्पा आहे. त्यामुळे अहमद अन्य मार्क्सवादी विचारकांप्रमाणे राष्ट्रवादाबद्दल शंका व्यक्त केलेली नाही. याउलट त्यांच्या मते राष्ट्रवादाकडे समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत दोन टप्प्यांना 'जोडणारा दुवा' म्हणून बघितले पाहिजे. तिसऱ्या जगातील अनेक मार्क्सवादी विचारकांनी जागतिक भांडवलशाहीविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रवादाला एक प्रभावी अस्त्र मानले आहे. अहमद यांच्या मते, जागतिक राज्यव्यवस्थेमध्ये दुबळ्या राज्यांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी प्रगतिवादी आणि क्रांतीकारी स्वरुपाच्या राष्ट्रवादाची आवश्यकता आहे. बहुतांश तिसऱ्या जगातील राज्यांची पाळेमुळे ही वसाहतवादविरोधी संघर्षामध्ये आहेत. वर्तमान जागतिक अर्थव्यवस्थेला 'नव-वसाहतवाद' मानणाऱ्या मार्क्सवादी विचारकांच्या मते, ज्याप्रमाणे वसाहतवादाचा विरोध करण्यासाठी राष्ट्रवाद उपयुक्त ठरला, त्याचप्रमाणे तो नव-वसाहतवाद आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी प्रभावी ठरु शकतो. उदा. भारतात कम्युनिस्ट पक्षांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विरोध करण्यासाठी गैर-कम्युनिस्ट राष्ट्रीय सरकारांचेसुद्धा समर्थन केले आहे. ही भूमिका जरी श्रमिक वर्गाच्या तसेच मार्क्सवादाच्या आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनाच्या विरोधी वाटत असली तरीही शक्तिशाली पाश्चिमात्य बहुराष्ट्रीय कंपन्यांविरुद्ध लढण्यासाठी ती योग्य व समर्थनीय मानली जाते.

## ■ विश्लेषण आणि समीक्षा ■

राष्ट्रवाद आणि आधुनिक संस्कृती यांच्यातील संबंधांच्या विश्लेषणातून एक समान धागा लक्षात येतो, तो असा की, राष्ट्रवाद हा आधुनिकतेचा धर्म आहे. गेल्या दोनशे वर्षांच्या इतिहासात राष्ट्रवादाचा आधुनिकतेच्या प्रक्रियेशी अभिन्न संबंध राहिलेला आहे यामध्ये शंका नाही. आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेल्या राजकीय आणि आर्थिक उलथापालथींमध्ये राष्ट्रवादाने विभिन्न वर्गातील लोकांना एकत्रित आणून त्यांच्यांत परस्परसंबंध निर्माण करण्याचे कार्य केले आहे. असे असले तरीसुद्धा राष्ट्रवाद आणि आधुनिकीकरण यांच्यातील संबंधांमध्ये सरलता आहे असे म्हणता येणार नाही. याचे पहिले कारण म्हणजे

Scanned with CamScanner

राष्ट्रवाद देशातील आधुनिकीकरणाविरुद्ध कार्य करतो. उदा. देशात औद्योगिक आधुनिकीकरण होण्यासाठी किंवा टिकाव असतानासुद्धा राष्ट्रवादी चळवळी आंतरराष्ट्रीय व्यापारी करारांना विरोध करत आहेत. विकसनशील देशातील राष्ट्रवादाचा विचार केल्यास गेलनरने त्यावरून केलेले विश्लेषण असमाधानकारक वाटते. तिसऱ्या जगातील बहुतेक देशांमध्ये कृषि आणि औद्योगिक अशा क्षेत्रांमधील उत्पादनव्यवस्था दिसून येते, म्हणजे कृषिप्रधान अर्थव्यवस्थेपासून पूर्णत: औद्योगिक अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तित होण्यातील तिसऱ्या जगातील राष्ट्रांची ऐतिहासिक प्रगतीचे सर्वच टप्पे एकाच वेळी काबाड देशांमध्ये दिसून येतात. म्हणून पारंपरिक समाजातून कृषिप्रधान समाजात विकासाची प्रक्रिया किंवा त्या पुढील विकासाचा टप्पा ही कल्पना चुकीची वाटते. तसेच तिसऱ्या जगाच्या देशातील उदाहरणांचा विचार केल्यास या प्रक्रियेला पूर्ण होण्यास राष्ट्रवादामुळे मदत मिळाली असे समजणेसुद्धा चूक आहे.

दुसरे म्हणजे, 'पौर्वात्य' आणि 'पाश्चिमात्य' राष्ट्रवाद यातील भेदासंबंधी पुनर्विचार करणे आवश्यक आहे. पाश्चिमात्य राष्ट्रवादामध्ये जी गुणे आहेत, ती पौर्वात्य राष्ट्रवादामध्ये दिसून येत नाहीत असा प्रकार साधारणत: सर्व साहित्यामध्ये दिसून येतो. उदा. प्लॅमेनाझने असे मत मांडले की, पौर्वात्य राष्ट्रवादामध्ये सभ्यतेचा (civility) अंश कमी प्रमाणात दिसून येतो. सांस्कृतिक आणि राजकीय राष्ट्रवादामध्ये भेद करणे हे अधिक उपयुक्त ठरेल. परंतु बहुतेक विचारक हे पाश्चिमात्य राष्ट्रवादाला राजकीय स्वरूपाचे तर पौर्वात्य राष्ट्रवादाला सांस्कृतिक स्वरूपाचे मानतात. हा भेद आणखीन समजण्याचा वाटतो. कारण अनेक विचारकांनी पूर्णत: त्याउलट विचार मांडला आहे. तो असा की बहुतांश युरोपीय राष्ट्रे ही नैसर्गिक स्वाभाविक ऐतिहासिक प्रक्रियेतून विकसित झाली आहेत. परंतु आशियाई राष्ट्रे मात्र कृत्रिमरित्या निर्माण झाली आहेत असे मानता येईल. कारण त्यांच्या सीमारेषा साम्राज्यवादी सत्तांनी निश्चित करून दिल्या आहेत. म्हणून या विचारकांच्या मते पाश्चिमात्य राष्ट्रे ही सांस्कृतिक तर पौर्वात्य राष्ट्रे ही राजकीय स्वरूपाची आहेत. उदा. अनेक आफ्रिकन राष्ट्रांमध्ये मूळ असलेले वांशिक संघर्ष हे वसाहतवाद की साम्राज्यवादी सत्तांनी स्थानिक वांशिक गटांचा व भाषांचा विचार न करता आपल्या मर्जीने या राष्ट्रांच्या सीमारेषा आखून दिल्या आहेत. परिणामत: आज अनेक वांशिक आणि आदिम जमाती दोन राष्ट्रांमध्ये विभागलेल्या आहेत. त्याचप्रमाणे खूप भिन्नता असणारे अनेक वांशिक समुदाय या ना त्या एकाच राष्ट्रामध्ये बांधले गेले आहेत असेही चित्र दिसून येते. परिणामी या समुदायांमध्ये राजकीय संघर्षाचे हिंसक आणि भीषण स्वरूपाचे संघर्ष होताना दिसून येतात. विविध वांशिक वा सांस्कृतिक गटांना एकत्र एका राष्ट्रात बांधण्याची प्रक्रिया ही 'जाणीवपूर्वक केलेली राजकीय कृती' आहे असे म्हणता येईल. या कृतीमुळे मूळ राजकीय राष्ट्रवादाला अधू राहतो.

पारंपरिक राजकीय तत्त्वज्ञान आणि आधुनिक तत्त्वज्ञान यांच्यातील विरोधाभास स्पष्टपणे दिसून येतो. परंतु तेसुद्धा खरे आहे की काही ऐतिहासिक आणि भौगोलिक घटक असले तरीसुद्धा सर्व राष्ट्रवादांमध्ये काही समान वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे पौर्वात्य राष्ट्रवादाला घातक, गैर-उदारमतवादी आणि भावनात्मक समजणे तसेच पाश्चिमात्य राष्ट्रवादाला [illegible], बुद्धीनिष्ठ आणि सर्वसमावेशक मानणे चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे. अनेक विचारकांच्या मते, पाश्चिमात्य राष्ट्रवाद असो की पौर्वात्य राष्ट्रवाद असो, दोन्हींमध्ये 'विवेकशून्यता' हे एक लक्षण दिसून येते. उदा. एली केडुरी या विचारकाच्या मते, त्याप्रमाणे भारतीय क्रांतिकारी चळवळीत देवी कालीची पूजा केली जात असे त्याचप्रमाणे युरोपीय क्रांतिकारी राष्ट्रवादातसुद्धा हिंसा, आध्यात्मिकता, कालातीतता आणि अतार्किकता दिसून येते. तसेच पाश्चिमात्य राष्ट्रवादाला पूर्णत: उदारमतवादी, विवेकपूर्ण आणि सर्वसमावेशक मानणे चुकीचे आहे. केडुरी या इतिहासकाराच्या मते, एका सार्वत्रिक राजकीय तत्त्वाशी एक विशिष्ट वांशिक गट जोडणे हे सर्व राष्ट्रवादाचे मूळ लक्षण आहे. जॉन हचिन्सन या विचारकाच्या मते 'सांस्कृतिक आणि राजकीय राष्ट्रवाद' हा राष्ट्रांसंबंधी एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या संकल्पना आहेत. दोन्ही संकल्पना राष्ट्राला अधिक मजबूत आणि दृढ करण्याचे कार्य करीत आहेत.

Scanned with CamScanner